कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २९ एप्रिल २०२४
किंमत ४ ₹

## राज्यात पुन्हा अवकाळीचं संकट

**मुंबई :** महाराष्ट्राला अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. गेल्या महिनाभरापासून राज्यात अवकाळी पाऊस सुरू असल्यानं पिकांचं आणि फळबागांचं मोठं नुकसान झालं आहे. आता पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पाडण्याचा अंदाज आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना हवामान विभागाकडून पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

## परीक्षा लांबणीवर

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यामध्ये म्हणजेच २० मे रोजी मुंबईसहीत महाराष्ट्रातील एकूण १३ मतदारसंघांमध्ये मतदान पार पडणार आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने परीक्षा पुढे ढकलण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुंबई विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ अंतर्गत होणाऱ्या काही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सुधारित परिपत्रकानुसार ६ मे रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा आता १८ मे, ७ मे रोजी होणाऱ्या सर्व परीक्षा २५ मे, तर १३ मे रोजीच्या परीक्षा ८ जून रोजी घेण्यात येणार आहेत.

## ‘उमटे’त गढूळ पाणी

# जल आटले, संकट दाटले

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर | कावीळसह अन्य जलजन्य आजारांची भीती

**| अलिबाग | प्रमोद जाधव | पंचेचाळीस वर्षे जुन्या असलेल्या उमटे धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. पाणी कमी आणि गाळ जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हा गाळ काढण्यास जिल्हा परिषद उदासीन ठरत असल्याने आजही येथील नागरिकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला असून, त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या जलजन्य आजाराचा धोका उद्‌भवण्याची शक्यता वर्तविली जात आहे. धरणाने तळ गाठल्याने पाणीसंकटही गडद झाले आहे.**


अलिबाग तालुक्यातील उमटे येथील धरण रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अखत्यारित आहे. अलिबाग तालुक्यातील रामराज विभागातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये १९७८-७९ या कालावधीत उमटे धरण बांधण्यात आले. या धरणातून रामराज, सुडकोली, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, खानाव, बामणगाव, वरंडे, आक्षी, नागाव, रेवदंडा, चौल या ग्रामपंचायत हद्दीतील ४५ गावांतील सुमारे ६० हजारांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, या धरणाने तळ गाठला आहे. त्याचा परिणाम तालुक्यातील हजारो नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. दूषित पाण्यामुळे उलटी, जुलाब, कावीळ, विषमज्वरसारखे जलजन्य आजार होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पाणीकपातीचे संकट सुरु झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून या पाणीकपातीत वाढ करण्यात आली आहे. अनेक गावे, वाड्यांना तीन दिवसआड पाणीपुरवठा केला जातो. धरणाने तळ गाठला आहे. हजारो नागरिकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे.

> जोपर्यंत लोकांच्या डोक्यातील राजकीय गुलामीचा गाळ निघत नाही, तोपर्यंत उमटे धरण आणि त्यातील गाळ तसाच राहणार आहे. आम्ही २०१६ पासून आजपर्यंत या विषयावर अर्ज, तक्रारी करीत आहोत. उमटे धरणाच्या गाळाच्या आणि पाण्याच्या प्रश्नासाठी आता उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याची वेळ लोकांवर येणे ही नामुष्की राज्यकर्ते आणि प्रशासनाची आहे.
> – ॲड. राकेश नारायण पाटील, उमटे धरण आंदोलनकर्ते

**बारा ग्रामपंचायत हद्दीत ६० हजारांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा**

- धरणाची साठवण क्षमता ८७ दक्षलक्ष घनफूट
- पाण्याची शेवटची पातळी ४० मीटर
- धरणाची उंची ५६.४० मीटर
- धरणात गाळ साठल्याने साठवण क्षमता ३० दक्षलक्ष घनफुटाने कमी




# अबकी बार ४०० पार अशक्य



- उद्धव ठाकरे, शरद पवारांसाठी सहनुभूती
- भुजबळांच्या वक्तव्याने खळबळ

**| मुंबई | प्रतिनिधी |** अबकी बार ४०० पार अशक्य आहे. उद्धव ठाकरे, शरद पवारांसाठी लोकांमध्ये सहानुभूती आहे, असे खळबळजनक विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. तसे एनडीएचा मार्गही यंदा फार कळीण असून, बारामतीमध्येहोणारी लढत दुर्दैवी असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ यांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत भुजबळ बोलत होते.

भाजपचा मार्ग आता सहज सोपा राहिलेला नाही. यावेळी त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. ते म्हणाले, २०१४ आणि २०१९ सारखा भाजपचा मार्ग आता सहज सोपा राहिलेला नाही. त्यांनी दावा केलाय की, ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे ाआणि शरद पवार गटाचे नेते शरद पवार या दोघांचे पक्ष फुटले आहेत. त्यामुळे त्यांच्या बाजूने लोकांची सहानुभूती आहे. ज्याचा फायदा त्यांना लोकसभा निवडणुकीत मिळण्याची शक्यत आहे. भुजबळ असंही म्हणाले की, एनडीएचा मार्गही यंदा फार कठीण आहे.

छगन भुजबळांनी बारामतीतील पवार कुटुंबियांच्या लढतीवरही ही लढत दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, माझ्यासाठी हा थोडा भावूक क्षण आहे. जे कुटुंबीय मागची इतकी वर्षे एकत्र लढले, ते आता वेगळे झाले आहेत. आता जे सुरू आहे, ते काही लोकांना अजिबात आवडलेलं नाही. चूक कोणाची आहे, ती गोष्ट वेगळी परंतु हे जे आता सुरू आहे, ते नसते झाले तर बरे झाले असते, अशी खंत भुजबळ यांनी बोलून दाखविली.

याशिवाय नाशिकबाबतदेखील भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनीच माझे नाव पान ५ वर

# जरांगेंचा सरकारला पुन्हा अल्टिमेटम

### आरक्षणाचा निर्णय ६ जूनपर्यंत घ्या

**| बीड | वृत्तसंस्था |** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरुन मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारला अल्टिमेटम दिला आहे. आता आरक्षण प्रश्नावरून कोणालाही विनंती करणार नाही, अशी ठाम भूमिका जरांगे पाटील यांनी मांडली आहे. तसंच आरक्षण मिळालं नाही तर विधानसभेच्या आखाड्यात उतरणारच, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे. यासोबतच जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे.

‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिर्डीमध्ये एकदा विनंती केली होती, तुमचा माणूस आमच्यावर खोटे गुन्हे दाखल करतोय. खोट्या केस करतोय, हे थांबवा. मराठ्यांना सग्या सोयऱ्यातून आरक्षण द्या, ओबीसीतून आरक्षण द्या, अशी मागणी दोनदा केली. मी पण क्षत्रीय मराठा आहे, आता पुन्हा विनंती करणार नाही. मराठ्यांना ६ जूनपर्यंत आरक्षण दिलं नाही तर विधानसभेच्या आखाड्यात उतरणार पान ५ वर

## ‘भाजपा म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी’

**रत्नागिरी :** विनाशकाले विपरीत बुद्धी असा प्रकार भाजपाचा झाला आहे. भाजपाचा विनाश होतो आहे त्यामुळेच शिवसेनेला त्यांनी बाजूला केलं असावं, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. विनायक राऊत यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. समोर जो आहे त्याला टोप घालण्यापूर्वी आज कुठल्या पक्षात आहोत ते आठवावं लागतं, असा टोला उद्धव ठाकरेंनी नारायण राणेंना लगावला. लघु किंवा सूक्ष्म प्रकल्प कोकणात त्यांनी आणला का? असा सवालही ठाकरे यांनी विचारला आहे.




**आजचा अग्रलेख**
कमी टक्क्यांचा सांगावा

# गीतेंच्या विजयासाठी घटक पक्ष लागले कामाला



- आज वेश्वी येथे अनंत गीतेंच्या प्रचारार्थ जाहीरसभा
- आमदार जयंत पाटील, अनंत गीते मार्गदर्शन करणार

**| रायगड | खास प्रतिनिधी |** रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक चुरशीची होईल असे वाटत होते. मात्र, इंडिया आघाडीतील घटक पक्ष हे शिवसेनेच्या (ठाकरे गट) अनंत गीते यांना निवडून आणण्यासाठी कामाला लागले आहेत. प्रत्येक जिल्हा परिषद, पंचायत समिती मतदारसंघ, ग्रामपंचायत, गाव आणि शहरातील प्रभागनिहाय प्रचार बैठका घेतल्या जात आहेत. त्यांना चांगला पाठिंबा मिळत असल्याचे दिसते. सोमवारी सायंकाळी सहा वाजता अलिबाग-वेश्वी येथे गीतेंच्या प्रचारासाठी जाहीरसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

धनशक्तीविरोधात जनशक्ती असाच सामना होताना दिसत आहे. तटकरेंना पुन्हा निवडून देणार नाही, असे जनताच आता उघडपणे बोलू लागली आहे. संविधान बदलण्याची तयारी करणाऱ्या भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना शिंदे गटाला धडा शिकवण्याची शपथ इंडिया आघाडीतील शेकापसह काँग्रेस, शिवसेना ठाकरे गटाने घेतली आहे.

अनंत गीते यांच्या विजयासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी जोरदार कामाला लागले आहेत. दररोज प्रत्येक ठिकाणी प्रचारसभा, गाव बैठका, कॉर्नर सभा, प्रचार रॅली, घरभेटींवर भर दिला जात असल्याने मतदारांचे मन वळवण्यात त्यांना यश येत असल्याचे चित्र आहे. नुकतीच अलिबाग-चेंढरे हद्दीतील इंडिया आघाडीतील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली, तसेच सोमवारी वेश्वी येथे प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते, शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्यासह अलिबाग शहर, थळ, चेंढरे जिल्हा परिषद मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे शेकापचे अलिबाग तालुका चिटणीस पान ५ वर

## पंडित पाटील यांच्या वाढदिवसाचा अभीष्टचिंतन सोहळा रद्द



**| अलिबाग | वार्ताहर |** शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या तथा माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे महिनाभरापूर्वी निधन झाले आहे. या घटनेमुळे शेकापचे नेते माजी आ. पंडित पाटील यांच्या वाढदिवसाचा अभीष्टचिंतन सोहळा रद्द करण्यात आला आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा माजी आमदार पंडित पाटील यांचा १ मे रोजी वाढदिवस आहे. दरवर्षी पंडित पाटील यांचा वाढदिवस त्यांच्या पेझारी येथील निवासस्थानी, तसेच जिल्हाभरात विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरा केला जातो. त्याचप्रमाणे हजारोंच्या संख्येने रायगड जिल्ह्यातील तसेच राज्यभरातून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक पंडित पाटील यांना शुभेच्छा देण्यासाठी एकत्र येत असतात. परंतु, महिनाभरापूर्वीच पान ५ वर

**वेधक**

## भाजपमधील ‘महाजनपर्व’ संपणार?

**मुंबई :** भाजपला यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवण्यात महत्वाची भूमिका वठविणारे नेते प्रमोद महाजन यांची कन्या व विद्यमान खासदार पूनम महाजन यांचे तिकीट कापल्यानंतर एकेकाळी मुंडे-महाजनांच्या नेतृत्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या भाजपमधील ‘महाजनपर्व’ जवळ जवळ संपण्याच्या मार्गावर आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या एका कन्येचे तिकीट कापून दुसरी कन्या पंकजा यांना देण्यात आले आहे. त्यामुळे मुंडे परिवाराचे भाजपात अस्तित्व असले तरी आता प्रमोद महाजनांचे वारस निवडणुकीच्या राजकारणातून बाहेर फेकले गेले आहेत.

## माणगावात वाहतूक कोंडी

**माणगाव :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाल्याने प्रवासी नागरिकांचीही लगबग मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. त्यातच शाळा, विद्यालयाच्या परीक्षा आटोपल्याने गावी जाण्याची लगबग सुरु आहे. लग्नसराई सुरु झाल्याने नागरिकांनी गावाकडे कूच केली आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेत पुन्हा वाहतुकीची कोंडी होत असून, त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी होत असल्याने पर्यटक नागरिकांची चांगलीच तारांबळ उडत आहे.

# ८६ किलो ड्रग्ससह १४ पाकिस्तानी अटकेत

### भारतीय तटरक्षक दलाची गुजरातच्या सीमेवर कारवाई



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो आणि गुजरात दहशतवादविरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. या संयुक्त कारवाईदरम्यान भारतीय तटरक्षक दलाने गुजरात किनारपट्टीजवळील आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेजवळ १४ पाकिस्तानी नागरिकांना सुमारे ८६ किलो ड्रग्जसह अटक करण्यात आले आहे.

भारतीय तटरक्षक दलाने ट्विटरवर पोस्ट करुन माहिती दिली की, गुजरात एटीएस आणि एनसीबीने समुद्रात रात्रभर केलेल्या कारवाईत पश्चिम अरबी समुद्रात एक पाकिस्तानी बोट पकडली, ज्यामध्ये १४ पाकिस्तानी पान ५ वर

# रायगड जिल्ह्यात पारा चाळिशी पार

**जिल्ह्यात कमाल तापमान सातत्याने वाढत असून, रविवारी अनेक ठिकाणी तापमानाने चाळिशी पार केल्याचे दिसून आले. परिणामी उकाड्यात वाढ झाल्याने घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. उष्णतेचे चटके बसत असल्याने अंगाची लाही लाही होत आहे. रायगडातील वाढत्या तापमानाचा फटका पर्यटन व्यवसायाला बसत असून, ऐन हंगामात पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे दिसत आहे.**

## मुरुडच्या पर्यटनावर परिणाम



**| आगरदांडा/मुरूड जंजिरा | वार्ताहर |** शुक्रवार, शनिवारपासून रायगडातील तापमानात मोठी वाढ झाली असल्याचे जाणवत आहे. पर्यटन क्षेत्र तालुका असणाऱ्या मुरूड जंजिरा तालुक्यातदेखील उष्णतेचा पारा वाढला असून, ४१ सेल्सियसपर्यंत पोहोचला आहे. हवामान खात्याने उष्णतेची लाट येणार पान ५ वर

## पोलादपुरात तापमान वाढीचा कहर

**पोलादपूर :** तालुक्यात हिवाळ्यात रक्त गोठवणारी थंडी तर पावसाळ्यात मुसळधार पाऊस असतो, तसाच उन्हाळाही कमालीचा अंगाची काहिली करणारा जाणवत आहे. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास तब्बल ३२ अंश सेल्सियस तापमान असलेल्या पोलादपूर तालुक्यात सायंकाळी ४ वाजून ४५ पान ५ वर

# माथेरानच्या राणीला वाढती पसंती

- वर्षभरात पाच लाख पर्यटकांनी केला प्रवास
- ३.५४ कोटी रुपयांची कमाई

**| माथेरान | वार्ताहर |** **मुंबई, पुणे, ठाण्यातील नागरिकांची सर्वात जवळचे पर्यटनस्थळ म्हणून आजही माथेरानला पहिली पसंती असते. दरम्यान, माथेरानला येणाऱ्या पर्यटकांची पहिली पसंती माथेरानच्या राणीला असून, २०२३-२४ या आर्थिक वर्षात माथेरानमध्ये एकूण पाच लाख प्रवासी वाहतूक करण्यात आली आहे. या माध्यमातून वर्षभरात ३.५४ कोटींची कमाई करण्यात आली आहे.**


११७ वर्षांपूर्वी सुरू झालेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन ही भारतातील काही ऐतिहासिक पर्वतीय रेल्वे सेवांपैकी एक आहे. मध्य रेल्वेकडून नेरळ ते माथेरानपर्यंतच्या पर्वतरांगांना प्रदक्षिणा घालणाऱ्या अरुंद गेज मार्गावर मिनीट्रेन सेवा चालवण्यात येते. त्यामध्ये अमन लॉज ते माथेरानदरम्यान शटल सेवेचा समावेश आहे. सध्या मध्य रेल्वे नेरळ-माथेरान-नेरळदरम्यान दररोज चार सेवा आणि अमन लॉज-माथेरान-अमन लॉजदरम्यान १६ सेवा चालविण्यात येत आहेत. त्यापैकी १२ सेवा दररोज चालतात आणि चार विशेष सेवा फक्त आठवड्याच्या शेवटी (शनिवार आणि रविवार) चालतात. २०२३-२४ या आर्थिक वर्षात माथेरानमध्ये एकूण पाच लाख प्रवासी वाहतूक करण्यात आली असून, त्यात अमन लॉज ते माथेरानदरम्यान ३.७५ लाख प्रवासी आणि नेरळ ते माथेरानदरम्यानच्या १.२५ लाख प्रवाशांचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये अमन लॉज आणि माथेरानदरम्यान रु. २.४८ कोटी आणि नेरळ आणि माथेरानदरम्यान रु. १.०६ कोटींचे यासह एकूण उत्पन्न रु. ३.५४ कोटींचे आहे.



> पॉड हॉटेलच्या विकासाचे आणि कामकाजाचे कंत्राट ई-लिलावाद्वारे देण्यात आले आहे. पॉड हॉटेलसाठी बुकिंगचे पर्याय सुलभ असणार आहेत. पर्यटक रिसेप्शनवर आणि ऑनलाइन अशा दोन्ही माध्यमांतून मोबाइल ॲपद्वारे पॉड आरक्षित करू शकणार आहेत. हा उपक्रम केवळ पर्यटकांसाठी अनुभवच वाढवणारच नाही, तर पर्यटनाला चालना देऊन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्थानिक अर्थव्यवस्थेतही महत्त्वपूर्ण योगदान देतील.

मध्य रेल्वेने माथेरान येथे स्लीपिंग पॉड्स, ज्याला पॉड हॉटेल म्हणूनही ओळखले जाते. ते बांधण्याची तयारी केली आहे. त्यामध्ये सिंगल पॉड्स, डबल पॉड्स आणि फॅमिली पॉड्स असणार आहेत. यामुळे पर्यटकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी निवासाचे विविध पर्याय उपलब्ध असणार आहेत. या वातानुकूलित पॉड्समध्ये मोबाईल चार्जिंग सुविधा, लॉकर रूम सेवा, फायर अलार्म, इंटरकॉम सिस्टम, डिलक्स टॉयलेट आणि बाथरूम आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहेत.

# जांभुळवाडीत ‘जलजीवन’चे तीनतेरा



- ग्रामस्थांवर पाणी विकत घेण्याची वेळ
- शासकीय टँकर सुरू करण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |** कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायतीमधील जांभुळवाडीतील स्थानिक आदिवासी बांधवांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. तेथे सुरू असलेल्या जलजीवन योजनेमधून राबविण्यात येणाऱ्या नळपाणी योजनेचे काम तात्काळ पूर्ण करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. तर, शासनाने जांभुळवाडीसाठी तात्काळ शासकीय टँकर सुरू करण्यात यावा, अशी मागणी वारे ग्रामपंचायतीकडे केली आहे.

७५ घरांची वस्ती असलेली जांभुळवाडी ही आदिवासी वाडी दुर्गम भागात वसली आहे. येथील महिलांना पिण्याचे पाणी वाहून नेण्यासाठी डोंगर उतरुन त्यानंतर दोन ते तीन हंडे भरून पाणी डोंगर चढून न्यावे लागते. पाणीटंचाई दूर व्हावी यासाठी जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना राबविली जात आहे. जांभुळवाडीच्या पान ५ वर




## वे|ध|क

### शिंदेंना अटक केल्यास आंदोलन

**दहिवडी :** सातारा लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर काल रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना जर अटक केली, तर राज्यातील तालुक्या-तालुक्यामध्ये संयमाने आणि लोकशाही मार्गाने संघर्ष करून हा अन्याय आणि अत्याचार महाराष्ट्र सहन करत नाही, हे दाखवून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा खणखणीत इशारा राष्ट्रवादीचे नेते खासदार शरद पवार यांनी दिला.

### शिवसंग्राम लोकसभेला तटस्थ राहणार

**पुणे :** 'लोकसभा निवडणुकीत शिवसंग्राम संघटनेने तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आहे. या निवडणुकीत महायुती किंवा महाविकास आघाडी कोणालाही समर्थन किंवा पाठिंबा देणार नाही. मात्र विधानसभेला संघटनेतर्फे १२ जागांवर निवडणूक लढविली जाणार आहे. त्यावेळी स्वतंत्र बैठक घेऊन पुढील दिशा ठरवली जाईल,फ्फ अशी माहिती शिवसंग्राम संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी दिली. संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची बैठक शनिवारी पुण्यात झाली. त्यानंतर मेटे यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीबाबतची भूमिका स्पष्ट केली.त्या म्हणाल्या, 'लोकसभा निवडणूक लढविण्याबाबत बीडच्या जनतेने मागणी केली होती. परंतु मी बीडमध्ये लोकसभा लढविणार नाही अशी भूमिका जाहीर केली. कारण आम्ही विधानसभेची चाचपणी केली. त्यामुळे जनतेच्या हिताचा आदर करण्यासाठी विधानसभेबाबत निर्णय घेतला आणि लोकसभेतून माघार घेतली.'

### नाशकात अनिकेत शास्त्रींची एन्ट्री

**नाशिक :** महायुतीला नाशिकच्या जागेवरील तिढा अद्याप तरी सोडवता आलेला नाही. शिवसेनेचा खासदार असलेल्या नाशिकवर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या जागेवरील दावा सोडला आहे. पण राष्ट्रवादीनं या जागेवरील दावा कायम ठेवला आहे. नाशकात आमचीही चांगली ताकद आहे, असं म्हणत भाजपनंही या जागेवर दावा सांगितला आहे. त्यामुळे नाशिकचा पेच कायम आहे.नाशिकचे खा. हेमंत गोडसे पुन्हा उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी त्यांनी अनेकदा मुंबईच्या वाऱ्या केल्या. मुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीगाठी घेतल्या, त्यांच्याशी चर्चा केल्या. श्रीकांत यांनी गोडसे यांनी गोडसेंना उमेदवारी जाहीर केली. पण अद्याप तरी पक्षानं अधिकृतपणे त्यांना उमेदवारी जाहीर केलेली नाही. त्यामुळे गोडसेंचं काय होणार हा प्रश्न कायम आहे.

# शाह, योगींनी कोकणात येऊ नये

## भास्कर जाधव यांचा इशारा; दक्षिण कोकणातील राजकीय वातावरण गरम

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांच्याविरोधात भाजपाने ठाकरेंचे कट्टर विरोधक असलेल्या नारायण राणे यांना उमेदवारी दिली आहे. राणेंना दिलेल्या उमेदवारीमुळे दक्षिण कोकणातील राजकीय वातावरण चांगलंच गरम झालं असून, ठाकरे गट आणि राणेंमध्ये जोरदार आरोप प्रत्यारोप होत आहेत. नारायण राणेंच्या प्रचाराला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आदी नेते येणार आहेत. या दौऱ्यांवरून ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी भाजपावर निशाणा साधला आहे.



अमित शाह , योगी आदित्यनाथ यांनी कोकणात येऊ नये, इथे आल्यास येथील जनता त्यांना कोकणचं पाणी पाजल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा भास्कर जाधव यांनी दिला आहे.

नारायण राणेंच्या प्रचारासाठी होणाऱ्या अमित शाह आणि योगी आदित्यनाथ यांच्या सभांवरून टोला लगावताना भास्कर जाधव म्हणाले की, खाशाबा जाधव एवढेसे होते. त्यांच्यासमोर भलेमोठे परदेशी पैलवान होते. तरीही त्यांनी त्यांना पराभूत करून पहिलं सुवर्णपदक जिंकलं होतं. आमचे विनायक राऊतही तसेच आहेत. मी आज अमित शाह आणि योगी आदित्यनाथ यांना सांगतो की तुम्ही कोकणात यायच्या भानगडीत पडू नका. इथे आलात तरी विनायक राऊत आणि कोकणातील जनता तुम्हाला कोकणच्या मातीचं पाणी पाजल्याशिवाय राहणार नाही.

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघामधून विनायक राऊत यांनी २०१४ आणि २०१९ मध्ये मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. त्यांनी नारायण राणेंचे पुत्र निलेश राणे यांना पराभूत केले होते. आता सलग तिसऱ्यांदा विजय मिळवून विजयाची हॅटट्रिक करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मात्र यावेळी विनायक राऊत यांच्यासमोर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे आव्हान आहे.

# 'देशासाठी मोदी-शाहांचे योगदान काय'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदावे तीव्र होताना दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीचे टप्पे जसजसे पुढे सरकत आहेत, तसा प्रचाराला वेग आलेला पाहायला मिळत आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघात भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडी सभा झाली. या सभेत बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावर टीकास्त्र सोडले. देशाच्या लढ्यात महाराष्ट्र सदैव पुढे असतो. यांची सत्ता उलथून टाकण्याची ताकद महाराष्ट्रात आहे. एकदा ठिणगी पडली की वणवा भडकतो. तुम्ही सगळे आयत्या बिळावर नागोबा आहेत. महाराष्ट्र लुटून सर्वकाही गुजरातला चालले आहे.



महाराष्ट्राला कंगाल करण्याचे काम सुरु आहे, या शब्दांत संजय राऊतांनी निशाणा साधला. देश उभा करण्यात मोदी-शाहांचे योगदान काय? देश उभा करण्यात मोदी-शाहांचे योगदान काय? महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दुःख मोदी-शाहांना कळणार नाही. मोदी आणि शाह महाराष्ट्राबद्दल सुडाचे राजकारण करतात. मोदी आणि शाहांना महाराष्ट्राचा राग आहे.

# शिवशक्ती-भीमशक्तीचा मुंबईत नव्याने प्रयोग

## वर्षा गायकवाड यांच्या उमेदवारीने संकेत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेसने मुंबईच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांना उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरवून, भाजपच्या विरोधात दमदार लढतीचे संकेत दिले आहेत. उमेदवारी जाहीर होताच, वर्षा गायकवाड यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेणे आणि ठाकरे यांनी माझे मत गायकवाड यांनाच, असे जाहीर करणे म्हणजे, मुंबईतील किमान दोन मतदारसंघापुरता हा काँग्रेस व शिवसेनेचा शिवशक्ती-भीमशक्तीचा नवा राजकीय प्रयोग असल्याचे मानले जात आहे.

वर्षा गायकवाड यांना काँग्रेसने उत्तर-मध्य मुंबई मतदारसंघातून उमेदवारी दिली. २०१४ नंतर या मतदारसंघातील गणिते बदलली,



हा मतदारसंघ सलग दोन वेळा भाजपच्या ताब्यात गेला. याच मतदारसंघात वास्तव्य असलेले उद्धव ठाकरे यांनी मी वर्षा गायकवाड यांना मत देणार, असे जाहीर केले आहे.

त्यातून त्यांना दक्षिण-मध्य मुंबई मतदारसंघात शिवसेनेचे अनिल देसाई यांच्या पाठीशी गायकवाड यांची धारावीची ताकद उभी करायची आहे. त्याच वेळी ठाकरेंचे वर्षा गायकवाड यांना मत म्हणजे उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातील ठाकरेंना मानणाऱ्या तमाम मतदारांना काँग्रेसच्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न आहे.

### दक्षिण-मध्य मुंबईतील समीकरणे

**माहीम विधानसभा मतदारसंघात मराठी मतदारांची संख्या लक्षणीय आहे. वडाळा मतदारसंघात वडाळा व नायगाव या भागात बौद्ध मतदारांची संख्या मोठी आहे. धारावी हा बहुधर्मीय, बहुभाषिक, बहुसमाज घटकांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात माटुंगा व धारावीतही दलित मतदार मोठ्या संख्येने आहेत. शीव कोळीवाड्यात त्या तुलनेत दलित मतदारांची संख्या कमी आहे. खा. चंद्रकांत हंडोरे यांचा या मतदारसंघात मोठा प्रभाव आहे.**

# नाशिकच्या जागेचा तिढा कायम

## पंतप्रधानांच्या दौऱ्यामुळे चर्चा लांबणीवर

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीकडून सोमवारी (दि. २९) उमेदवारी अर्ज दाखल होणार असताना महायुतीमध्ये लोकसभेच्या नाशिक मतदारसंघाचा तिढा अद्यापही कायम आहे. पंतप्रधान मोदी यांचा महाराष्ट्र दौरा असल्याने महायुतीचे वरिष्ठ नेते दौऱ्यात गुंतल्याने कुठलीही चर्चा झाली नाही. त्यामुळे इच्छुक पुन्हा नाशिकमध्ये परतले. ४३ दिवसांपासून नाशिक मतदारसंघाच्या उमेदवारीचा तिढा महायुतीमध्ये अद्यापही सुटलेला नाही. त्या तुलनेत महाविकास आघाडीने उमेदवारी जाहीर करून प्रचारात आघाडी घेतली आहे. महायुतीकडून भाजपतर्फे पूर्वचे आ. ॲड. राहुल ढिकले यांचे नाव आघाडीवर आहे. भाजपच्या वरिष्ठांकडून सूचना आल्यास



उमेदवारीसंदर्भात भाजपकडून तातडीने हालचाली गतिमान होतील. परंतु अजित पवार गट व शिंदे गट नाशिकच्या जागेसाठी आग्रही आहे.

ठाण्याच्या बदल्यात नाशिक किंवा नाशिकच्या बदल्यात ठाणे, असा अदलाबदलीचा फॉर्म्युला निश्चित होऊ शकतो. मात्र, नाशिकसाठी शिंदे गटाने आग्रह धरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत आले होते. मात्र भुजबळांनी उमेदवारी जाहीर करण्यासंदर्भात होत असलेला विलंब लक्षात घेऊन स्वतः माघार घेत असल्याची घोषणा केली.

मात्र, अद्याप राष्ट्रवादी काँग्रेसने नाशिकच्या जागेचा आग्रह सोडलेला नाही. त्यामुळे नाशिकच्या जागेवरून महायुतीमध्ये ट्विस्ट निर्माण झाले आहे.

# पृथ्वीराज चव्हाणांचा उदयनराजेंवर हल्लाबोल

**। सातारा । प्रतिनिधी ।**

आपली राज्यघटना शिल्लक राहणार आहे की नाही? लोकशाही टिकणार आहे की नाही? याचा फैसला या निवडणुकीतून होणार आहे. राष्ट्रवादीने तीन वेळेस खासदार करुन पाठवलं, एकदाही आम्हाला भेटायला परत आला नाही. आम्ही इथं मत देणार नाहीत. आम्ही एकाबाजूला दोन आमदार आहोत. त्यांच्याकडे चार आमदार आहेत. पालकमंत्री तिकडे आहेत. त्या पदाचा वापर रोज केला जातोय. शिंदे-फडणवीस सरकारशी आपल्याला लढायचे आहे. आपल्याला माहिती आहे की, विरोधी पक्षाच्या खासदारांनी गद्दारी केली. तीनदा निवडून दिलं तरीही पक्ष बदलला. तेव्हा श्रीनिवास पाटलांनी त्यांना पराभूत केलं. आता तर तीन पक्ष आपल्यासोबत आहेत,



असे काँग्रेस पक्षाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. त्यांनी भाजप उमेदवार उदयनराजे भोसले यांच्यावर कडाडून हल्लाबोल केला. साताऱ्यात महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ सभा पार पडली. यावेळी पृथ्वीराज चव्हाण बोलत होते. यावेळी शरद पवारही उपस्थितही होते.

चव्हाण म्हणाले, तीन पक्ष एकत्र आले आहेत, त्यामुळे आता मताधिक्य वाढलं पाहिजे. महागाई, बरोजगारी, शेतकरी आत्महत्या, भ्रष्ट्राचार, नैतिक भ्रष्ट्राचार हे महत्वाचे मुद्दे आहेत. ऑपरेशन लोटसच्या नावाखाली नैतिक भ्रष्ट्राचार केलाय. नरेंद्र मोदींनी महाराष्ट्रातील सरकार पाडलं. खोक्यांचा बाजार केला, काही जणांना राज्यसभा दिली. आज इंडिया आघाडीच्या वतीने शशिकांत शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. अचानक उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना निवडून देण्याचे काम आपण करुयात, असंही चव्हाण यांनी स्पष्ट केलं. लोकसभेच्या निवडणूकीचा रंग चढला आहे. यात बरेचसे नेते असे आहेत की जे आश्वासनच देत आहेत.

## पुण्यात टपाली मतदानाला पसंती

**पुणे :** जिल्ह्यातील चारही मतदारसंघांतील ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले एक हजार ३९७ मतदार; तर ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांग असलेल्या २६५ मतदारांनी घरीच टपाली मतदान करण्याची सुविधा मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी ८५वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांच्या, तसेच शारीरिक विकलांग मतदारांच्या घरी जाऊन टपाली मतदानावर भर दिला जात आहे. अशा मतदारांची यादी निश्चित करून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरी भेट देऊन टपाली मतदान करणार की मतदान केंद्रांवर जाऊन मतदान करणार याबाबतची माहिती घेतली.

# ईडीची गती वाढवा

**■ सदाभाऊ खोत यांचं वादग्रस्त विधान**

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापूरमधील माढा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रणजीतसिंह निंबाळकर यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या सभेत रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी शरद पवार यांचा 'म्हातारा' असा उल्लेख करत त्यांच्यावर तोंडसूख घेतले होते. तर याच भाषणात फडणवीस यांचे कौतुक करत असताना त्यांनी ईडीवर वादग्रस्त विधान केले आहे. या विधानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी यावर टीका केली आहे.

खोत म्हणाले, कुणी काहीही म्हणू द्या, पण देवेंद्र फडणवीस यांना मानतो. लोक म्हणतात काही झालं तरी ईडी मागे लावतात. पण मी म्हणतो ईडीची गती वाढवा. गडी एकतर आपल्यात आला पाहिजे. नाहीतर घाबरून मेला पाहिजे. सदाभाऊ खोत यांच्या विधानामुळे आता विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका सुरू केली आहे.

खोत यांच्या विधानावर शिरूरचे खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी टीका केली. ते म्हणाले, सदाभाऊ खोत म्हणतात, ईडीची अशी भीती दाखवा की, गडी एकतर घाबरून महायुतीत आला पाहिजे नाहीतर कोलमडून पडला पाहिजे असे ते म्हणाले.

## शेंडगेंच्या मोटारीला चपलांचा हार

**। सांगली । प्रतिनिधी ।**

सांगली मतदारसंघातील ओबीसी बहुजन पार्टीचे उमेदवार, माजी आ. प्रकाश शेंडगे यांच्या मोटारीला अज्ञातांनी चपलांचा हार घालून काळे फासले. तसेच निवडणुकीतून माघार आणि मराठा समाजाच्या नादी लागू नकाफ असा धमकीचा मजकूर असलेले पत्र चिटकवण्यात आले आहे. सांगलीतील ग्रेट मराठा समोर हा प्रकार घडला आहे. सांगलीत मुक्कामास असताना ते ग्रेट मराठा हॉटेलमध्ये उतरले होते. त्यांची मोटार हॉटेलसमोर पार्किंगमध्ये लावली होती. पहाटेच्या सुमारास त्यांच्या मोटारीला चपलांचा हार घातला. तसेच मोटारीवर काळा रंग फासला.

# दादांचे कार्यकर्ते बारामतीत

## भाजप, शिंदेसेनेचे ठरेना, सगळेच संभ्रमात

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात महायुतीला अद्याप उमेदवार ठरवता आलेला नाही. महायुतीत ही जागा कोणत्या पक्षाला मिळणार याचाच निर्णय अद्याव झालेला नाही. त्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत. महायुतीचा उमेदवार २ मे रोजी जाहीर होणार असल्याचं सांगण्यात येत आहे.



उमेदवार जाहीर करण्यास जितका उशीर होईल, तितके प्रचाराला दिवस कमी मिळतील, असं कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे. महाविकास आघाडीकडून विद्यमान खा. राजन विचारे रिंगणात आहेत. ठाकरेसेनेनं निष्ठावंत विचारेंना पुन्हा संधी दिली आहे. महायुतीच्या कार्यकर्त्यांना ठाणेकर तुमचा उमेदवार ठरणार तरी कधी? असा प्रश्न विचारु लागले आहेत.

आपला उमेदवार कोण असणार असा प्रश्न महायुतीमधील शिंदेसेना, भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी आपापल्या पक्षाच्या आमदारांना, जिल्हाध्यक्षांना विचारल्यास त्यांच्याकडून उत्तर मिळत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य ठाणेकरांना उत्तरं देताना सर्वसामान्य कार्यकर्त्यांची अडचण होत आहे.

वरिष्ठांनाच कल्पना नसल्यानं कार्यकर्तेही अनभिज्ञ आहेत. ठाण्यातील उमेदवाराचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे आणि फडणवीसच घेतील, हे दोन नेतेच त्याबद्दल सांगू शकतील, असं ठाण्यातील शिवसेना, भाजपचे वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचं म्हणणं आहे. ठाण्याचा उमेदवार ठरत नसल्यानं अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते बारामतीला निघून गेलेत. ते तिथे सुनेत्रा पवारांचा प्रचार करत आहेत.

# छ. संभाजीनगरात महायुतीला मोठा धक्का

**। संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

छत्रपती संभाजीनगर मतदारसंघामध्ये राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज घोडके यांनी लोकसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करुन छ. संभाजीनगरमध्ये राष्ट्रवादीत मोठी फूट पडल्याचं समोर आलं आहे. राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज घोडके यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्ज मागे घेणार नसून पूर्ण ताकतीने निवडणूक लढू आणि ओबीसी समाजाचा एक खासदार



संसदेत पाठवू अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. महायुतीला ओबीसीच्या मतांची गरज नसल्यामुळे आमचा प्रतिनिधी असावा म्हणून अर्ज दाखल केल्याचं घोडके यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

घोडके हे राष्ट्रवादीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष आहेत, सोबतच ते समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष देखील आहेत.

भुजबळ यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख आहे. घोडके यांचा उमेदवारी अर्ज कायम राहिल्यास छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात ओबीसी मतांमध्ये मोठी फूट पडू शकते, त्याचा फटका हा महायुतीच्या उमेदवाराला बसण्याची शक्यता आहे.

# ...तर पुन्हा माझ्या घराची पायरी चढू नका

**■ अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सज्जड दम**

**। बारामती । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबात फूट पडल्यानंतर होणारी निवडणूक काका, पुतण्यासाठी प्रतिष्ठेची आहे. बारामतीवरचं वर्चस्व दाखवण्यासाठी शरद पवार, अजित पवार कामाला लागले आहेत. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्यासमोर खा. सुप्रिया सुळेंचं आव्हान आहे.

अजित पवार सध्या सुनेत्रा पवारांच्या प्रचारात व्यग्र आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या भाषणातील एक विधान वादात सापडलं. आता शिर्सुफळ येथे सुनेत्रा पवार यांच्या



प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अजित पवारांचं भाषण झालं. मजर तुम्ही माझ्या बाबतीत काही चूक केली तर पुन्हा माझ्या घराची पायरी चढायचं नाही. काहीजण माझी सभा झाली रे झाली की समोरच्या पार्टीकडे जातात. बिनविरोध मी पदे दिली आणि प्रचार मात्र, त्यांचा करत आहेत. कुंकू लावायचं असेल तर एकाचंच लावा. माझं तरी लावा नाहीतर त्यांचं तरी लावा. मला कळते जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सुद्धा मला कळलं होतं. जर माझ्या बाबतीत काही चूक झाली तर त्यांनी पुन्हा माझ्या घराची पायरी चढायची नाही, असा सज्जड दम अजित पवारांनी दिला.

# चंद्रपूरची निवडणूक आरसा दाखवणारी

## मतदारांना राष्ट्रीय मुद्द्यांपेक्षा स्थानिक मुद्दे महत्त्वाचे

**। चंद्रपूर । प्रतिनिधी ।**

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाट पाहायला मिळाली. या लाटेवर स्वार होऊन अनेकांनी विजयाचा जल्लोष साजरा केला. त्यावेळी जे विजयी झालेत ते आत्ता सुद्धा मोदी लाट असल्याच्या भ्रमात आहेत. हा भ्रम पाण्यावर उठणाऱ्या बुडबुड्याप्रमाणे आहे, याचा साक्षात्कार नवनीत राणा यांना झाला आहे. मोदींची हवा आहे, या फुग्यात राहू नका. २०१९ मध्ये मी अपक्ष असताना जसे काम केले, तसेच करा, असे वक्तव्य राणा यांनी केले होते. समाजमाध्यमांनी राणांचे हे वक्तव्य चांगलेच उचलून धरले. त्यानंतर माझ्या बोलण्याचा वेगळा अर्थ मीडियाने लावला, असे बोलून



राणा यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

मात्र यातून हे लक्षात आले की, राणांच्या पोटातलं शेवटी ओठावर आलंचं. राज्यातील एकंदरीत वातावरण बघता मोदी लाट ओसरली असल्याचे सध्या तरी चित्र दिसत आहे. या लाटेचा थेट परिणाम चंद्रपूर लोकसभेत सुद्धा बघायला मिळाला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, छगन भुजबळ, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी नेते मंडळींनी चंद्रपूरात हजेरी लावली होती तसेच सिने कलावंताचा रोड शो सुद्धा झाला.

सध्याची चर्चा बघता याचा फार फायदा महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांना झालेला दिसत नाही. मोठे नेते, स्टार प्रचारकांची उपस्थिती नसतानाही महाविकास आघाडीच्या प्रतिभा धानोरकर यांचे नाव चर्चेत आहे. स्वतःचे कार्य व कर्तृत्व मतदारांपुढे न ठेवता, केवळ आपल्या नेत्याचा जप करणाऱ्या उमेदवारांना चंद्रपूरची निवडणूक आरसा दाखवणारी ठरली आहे. चंद्रपूर, गडचिरोली मतदार संघातील ग्रामीण भागात हातावर आणून पानावर खाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. ग्रामीण भागातील या मतदारांना राष्ट्रीय प्रश्नांशी तसंही काही देणं घेणं नव्हतं. त्यांना गावाचा आणि स्वतःचा विकास हवा होता. यावर नेते बोलतील अशी अपेक्षा त्यांना होती मात्र तसे काही घडले नाही. त्यामुळे काँग्रेस आणि भाजपावर मतदार नाराज होते. भाजप सत्तेत असल्याने या नाराजीचा सर्वाधिक फटका भाजप उमेदवारांना बसला आहे.

### स्थानिक मुद्दे गायब...

**लोकसभेच्या निवडणुकीमध्ये स्थानिक मुद्दे गायब झाल्याचे चित्र प्रत्येक मतदारसंघात दिसत आहे. सभेला संबोधित करताना राष्ट्रीय मुद्द्यांवरच उमेदवार बोलताना दिसत आहेत. महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेले चंद्रपूर आणि मागासलेपणाची चादर ओढून बसलेला गडचिरोली मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांनी राष्ट्रीय मुद्द्यांवरच अधिक भाष्य केले.**

# मतदानाचा टक्का राखण्याचे आव्हान

**सुयोग आंग्रे**
**। रायगड ।**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच उन्हाळ्याच्या सुट्टीचा मुहूर्त साधत मतदारांनी सुट्ट्यांचे नियोजन सुरु केले आहे. एसटी, खासगी बस, रेल्वे अशा मिळेल त्या वाहनाने रायगडकर भटकंतीला निघाले आहेत. त्यामुळे रायगड लोकसभा मतदार संघातील मतदानाची टक्केवारी राखण्याचे मोठे आव्हान निवडणूक आयोगापुढे आहे. यासोबत हक्काच्या मतदारांना मतदानासाठी रायगडात आणण्याचे शिवधनुष्य राजकीय पक्षांना पेलावे लागणार आहे.

राज्यभरात तापमानाचा पारा वाढल्याने आधीच पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये मतदानाचा टक्का घटला आहे. रायगड जिल्ह्यातही वाढत्या तापमानामुळे हाच ट्रेन्ड कायम राहिल्यास मतदानाची टक्केवारी घसरण्याची दाट शक्यता आहे. त्यातच सुट्ट्यांमुळे होत असलेल्या तात्पुरत्या स्थलांतरामुळे त्यात अधिकची भर पडणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगासोबत राजकीय पक्षही चिंतेत असून मतदानाचा टक्का वाढवण्याऐवजी पूर्वीची टक्केवारी राखण्याचे मोठे आव्हान दोघांपुढेही असणार आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ६४.७३ टक्के आणि २०१९ मध्ये मतदानाची टक्केवारी तीन टक्क्यांनी घसरून ६१.७७ टक्के एवढी कमी झाली होती. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत २ लाख ६३ हजार ३५६ पुरुष तर २ लाख ७६ हजार १२१ महिला मतदारांनी मतदान करण्यासाठी पाठ फिरवली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ३ लाख ४ हजार ३६८ पुरुष आणि ३ लाख २७ हजार ४ महिला मतदारांनी मतदान केले नाही.

रायगड लोकसभा मतदार संघात रायगड जिल्ह्यातील पेण , अलिबाग, श्रीवर्धन आणि महाड तर रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि दापोली असे एकूण सहा मतदारसंघ आहेत. त्यानुसार रायगड लोकसभेसाठी १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार आहेत. यामध्ये आठ लाख २० हजार ६०५ पुरुष, आठ लाख ४७ हजार ७६३ महिला आणि ४ थर्ड जेंडर मतदारांचा समावेश आहे. यामध्ये मराठी मतदारांबरोबरच देशातील विविध प्रांतातील मतदारदेखील आहेत. सध्या शाळांना उन्हाळी सुट्टी लागल्याने अनेकांनी आपल्या कुटुंबासह गावचा रस्ता धरला आहे. त्यामुळे यंदा रायगड लोकसभेसाठी किती टक्के मतदान होणार, अशी चिंता निवडणूक अधिकाऱ्यांच्या बोलण्यातून जाणवत आहे. मतदानाचा टक्का वाढवणे सोडा, २०१९ च्या निवडणुकीत झाले होते, तेवढी टक्केवारी राखता यावी म्हणून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची धडपड सुरू आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात जाण्यासाठी प्रवाशांकडून सर्रासपणे एसटीला पसंती दिली जात आहे. महिलांना एसटीमध्ये पन्नास टक्के सवलत असल्याने गाड्यांमध्ये बहुतांशी महिला प्रवासी असल्याचे दिसून येत आहे. एसटी महामंडळाकडून दररोज मुंबई सेंट्रल, परळ, दादर, कुर्ला नेहरूनगर, बोरिवली, कल्याण , ठाणे , पुणे, औरंगाबाद , शिर्डी येथे जाण्यासाठी गाड्या सोडल्या जात आहेत.

उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड या राज्यांमध्ये लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे रायगडात वास्तव्याला असलेल्या अनेक मजुरांनी उन्हाळी सुट्टी आणि निवडणुकीचा मुहूर्त साधत गावी पलायन केले आहे. त्याचबरोबर पश्चिम बंगाल ओडिशाला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. त्यामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वेकडून नियमित गाड्यांबरोबरच १५ मार्चपासून उन्हाळी स्पेशल ट्रेन चालवल्या जात आहे. आतापर्यंत रेल्वेच्या विशेष गाड्यांच्या माध्यमातून कामगारांनी घर गाठले आहे.



रायगड लोकसभा मतदारसंघात मंगळवार, सात मे रोजी मतदान होणार आहे. जास्तीत जास्त मतदारांना मतदान करता यावे, म्हणून सरकारी कार्यालयांबरोबर अनेक खासगी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शनिवारी–रविवारची हक्काची वीकेंडची सुट्टी आहे. त्यानंतर मंगळवारी मतदानाची सुट्टी मिळणार आहे. त्यामुळे सोमवारी एक दिवसाची दांडी अथवा सुट्टी घेण्याच्या तयारीत अनेक कर्मचारी दिसत आहेत. त्याचाही रायगड लोकसभा मतदानावर परिणाम होऊ शकणार आहे.

## जिल्हा निवडणूक विभागाचे प्रयत्न

- गावागावांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्सच्या माध्यमातून जनजागृती
- सामाजिक संस्थां, विद्यार्थी, कलाकारांकाराच्या मदतीने मोहिमा
- पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाचे आवाहन
- दुचाकी , सायंकाळच्या माध्यमातून जनजागृती
- शहरात होर्डिंग्ज, सेलिब्रिटींसोबत मतदानासाठी पत्रव्यवहार
- सोशल मीडियावर मतदानाबद्दल जनजागृती

# उरणमध्ये मावळ मतदार संघाचे उमेदवार संजोग वाघेरे - पाटलांचा प्रचार दौरा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्या प्रचारार्थ दौऱ्यात उरण तालुक्यातील नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे. वाघेरे - पाटील यांच्या उरण तालुक्यातील गावनिहाय प्रचार दौऱ्याला जासई येथून सुरुवात झाली. यावेळी प्रथम जासई येथील शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करून तालुक्यातील गावनिहाय प्रचाराला सुरुवात करण्यात आली.



गावागावात फटाक्यांच्या आतषबाजीत नेते मंडळींचे व कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. महाविकास आघाडीचे नेते व कार्यकर्ते प्रचाराच्या तयारीला लागले असून, मशाल या निशाणीचा प्रचार मतदार संघात जोरदारपणे सुरू आहे.

या प्रचार दौऱ्यात इंडिया आघाडीचे मार्गदर्शक बबन पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे सरचिटणीस प्रशांत पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, भूषण पाटील, शिवसेना जिल्हा उपप्रमुख नरेश रहाळकर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, महिला काँग्रेस अध्यक्षा रेखा घरत, शेकापच्या सीमा घरत, विकास नाईक, काका पाटील आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## लघु चित्रपटाद्वारे मतदान जागृती

**पाली/बेणसे :** गटविकास अधिकारी पेण, भाऊसाहेब पोळ यांच्या संकल्पनेतून पेण पंचायत समिती शिक्षण विभागाकडून ‘हा डाग चांगला’ आहे या आदिवासी बोलीभाषेतील लघुपटाची निर्मिती करण्यात आली आहे. त्या माध्यमातून ठिकठिकाणी मतदानाबाबत जनजागृती केली जात आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून वेगवेगळ्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती केली जाते. मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी, पथनाट्य यांसारखे उपक्रम राबवले जात असतानाच आदिवासी बोलीतील हा लघुपट उल्लेखनीय व प्रभावी ठरत आहे.

# ‘वाघेरे - पाटलांना उरणमधून ५० हजारांची आघाडी देणार’



**। उरण । वार्ताहर ।**

मागच्या लोकसभेच्या निवडणुकीवेळी शिवसेना व भाजप एकत्र असून सुद्धा पार्थ पवारांना बरोबरीची मते मिळाली होती. आताच्या निवडणुकीत शिवसेना महाविकास आघाडीत आहे त्यामुळे संजोग वाघेरे पाटील यांना ५० हजारांची आघाडी उरण विधानसभेतून मिळेल असे भाकीत रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांनी केले.

स्वर्गीय लोकनेते दि.बा.पाटील साहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करून मावळ लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचाराची सुरुवात जासई येथून करण्यात आली. दोनवेळा मावळचे खासदार असलेले श्रीरंग बारणे हे स्थानिकांच्या समस्या व प्रश्न मार्गी लावण्यास सपशेल अपयशी ठरले आहेत, असे घरत म्हणाले.

केंद्राच्या डीपीडी धोरणामुळे पंधरा ते वीस हजार तरुणांना रोजगार गमवावे लागले. उरण विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था झालेली आहे, उरणला सुसज्य हॉस्पिटल नाही, नागरिकांना मुबलक पाणी मिळत नाही. विविध पोर्ट मध्ये स्थानिकांना डावलून परप्रांतीयांची भरती होत आहे त्याच्यावर खासदार तोंड उघडायला तयार नाहीत.उलट जेएनपीटी चा सीएसआर फंड हा आरएसएस च्या संघटनांना परस्पर दिला जातो स्थानिकांसाठी फंड वापरला जात नाही. खासदारानी आपल्या मुलाच्या नावे पार्किंग बळकावून स्वत:ची पोळी भाजण्याचे काम केले आहे. त्यामुळे स्थानिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे त्याचा परिणाम येणाऱ्या निवडणुकीत दिसून येईल.असे घरत म्हणाले.

संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचार रॅलीसाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील शिवसेनेचे बबन पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, प्रीतम म्हात्रे, रवि घरत, प्रशांत पाटील, नरेश रहालकर, भूषण घरत, नरेश घरत, विकास नाईक आदी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांची चंगळ

**पाली :** लोकसभा निवडणूक जाहीर होताच रायगड लोकसभेसाठी मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. आपापल्या आघाडी आणि युतीच्या उमेदवारांचा प्रचार प्रसार कसा करावा याचे बेत आखले जात आहेत. प्रचारार्थ मेळावे व बैठका होऊ लागल्याने सामान्य कार्यकर्त्यांना अच्छे दिन आले आहेत. गेली पाच वर्ष सामान्य कार्यकर्त्यांकडे ढुंकूनही न पाहणारे राजकीय नेते कार्यकर्त्यांची विचारपूस करु लागले. निवडणुकीची वाट पाहणारे कार्यकर्ते कमविण्याच्या बेतात आहेत.

# महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ गाव बैठकांचा धडाका

**। पनवेल । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ पनवेल विधानसभा मतदारसंघातील नेरे आणि वावंजे जिल्हा परिषद गट हद्दीतील गावांना भेटी देण्यावर जोर देण्यात आला. प्रत्येक गावात महाविकास आघाडीच्या नेत्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. गाव बैठकांना मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता ग्रामीण विभागातून संजोग वाघेरे पाटील आघाडीवर राहतील असे चित्र सध्या स्पष्ट होत आहे.



रविवारी सकाळी १० वाजता गाव बैठकांना प्रारंभ करण्यात आला. आदई, नेवाळी, कोळवाडी, पाले बुद्रुक, वलप, कानपोली, खेरणे, नितळस, वावंजे, चिंध्रण, शिरवली, कुत्तरपाडा, महाळूंगे, मोर्बे, खानाव, वाकडी, तळोजा पांचनंद, केवाळे, हरीग्राम या गावांमध्ये प्रचार बैठका संपन्न झाल्या. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विद्यमान खासदारांच्या निष्क्रिय कार्यप्रणालीवर जोरदार शाब्दिक प्रहार केले. संजोग वाघेरे यांच्या रूपाने प्रतिनिधी दिल्लीला पाठवा असे आवाहन सर्वच वक्त्यांनी मतदारांना केले.

# ‘कासु विभागातून अनंत गीतेंना आघाडी मिळवून देणार’

**। गडब । वार्ताहर ।**

कासु विभागात महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंना पाठिंबा मिळत असून या विभागात इंडीया आघाडीचे वर्चस्व असून अनंत गीतेंना आघाडी मिळणार असल्याचे विष्णु पाटील, नरेश गांवड यांनी सांगितले.



रायगड लोकसभेच्या निवडणुकीत इंडीया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ कासु विभागातील गावांमध्ये गावनिहाय प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी ‘कहो दिलसे अनंत गीते फिर से’ असा नारा दिला. तसेच, ‘फक्त विजय नको, ऐतिहासिक विजय मिळवायचा’ असा निर्धार केला.

# महाविकास आघाडीला प्रतिसाद; विरोधक धास्तावले

**। रसायनी । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदारसंघातून घरोबा करणाऱ्या विद्यमान खासदारांना संजोग वाघेरे पाटील यांना मिळणारा पाठिंबा घाम फोडत आहे. संविधानिक मार्गाने संजोग वाघेरे पाटील यांचा पाडाव करणे अशक्य वाटू लागल्याने विद्यमान खासदाराने रडीचा डाव खेळण्यास प्रारंभ केला आहे.



याबाबत एकंदरीत जनतेतील प्रतिक्रिया घ्यायचा प्रयत्न केला असता बहुतांश नागरिकांचे असे म्हणणे आहे की, जर विद्यमान खासदारांनी गेल्या दहा वर्षात प्रामाणिकपणे काम करत जनसेवा करायला हवी होती. ज्या पद्धतीने अहवालांची कागदे रंगवण्याचे काम विद्यमान खासदारांकडून होत आहे. एकंदरीतच सत्ता परिवर्तनाचे संकेत मिळू लागल्यामुळे विद्यमान खासदारांनी रडीचा डाव खेळला असल्याची प्रतिक्रिया समाजाच्या सर्वच स्तरांतून उमटत आहे.

गेल्या दहा वर्षात स्वतः केलेल्या कामांच्या जोरावरती निवडून येणे अशक्य वाटत असल्यामुळे विद्यमान खासदारांनी साम, दाम, दंड, भेद ही नीती वापरणे सुरू केल्याची चर्चा मावळ लोकसभा मतदारसंघात पहावयास मिळत आहे.

## वेधक

## जनतेचे प्रश्न मार्गी लावणार



अनंत गीते यांचे प्रतिपादन

**माणगांव :** तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राकडे लक्ष दिले नाही. पण आता खासदार झाल्यावर महाड, विळे भागड औद्योगिक क्षेत्रात असणारे सर्व प्रश्न मार्गी लावेन असे प्रतिपादन इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी निजामपूर येथे झालेल्या प्रचार सभेत केले.

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार व इतर मित्र पक्ष इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ निजामपूर येथील ग. रा. मेथा विद्यालयातील सभागृहात प्रचार सभा पार पडली. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, नगराध्यक्षा स्नेहल जगताप, तालुकाप्रमुख गजानन अधिकारी, महिला तालुकाप्रमुख म्हामुनकर, ॲड. ठाकूर, बळीराम घाग, उपतालुका प्रमुख चंद्रकांत पवार, विभागप्रमुख महालुंगे, जनार्दन मानकर, धनाजी देशमुख, प्रभाकर मानकर, सोनावणे, संजय साखरे, विश्वनाथ कामेरकर आदी इंडिया आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी गीते पुढे म्हणाले की, विविधता व एकताने सुखी नांदत असलेल्या देशात या सरकारने नख लावलेला आहे. मोदींमुळे देश हुकूमशाहीकडे वळत आहे. गेली ४५ वर्ष मी राजकारणात सक्रिय आहे. शाखाप्रमुख ते खासदार असा माझा प्रवास असून सुद्धा माझ्यावर एक ही डाग व भ्रष्टाचाराचा आरोप नाही. मला कसलीही हाव नाही. परमेश्वराने मला भरपूर काही दिलंय. ही निवडणूक जनतेने हातात घेतली असून जनता आता मोदींना तडीपार करणार आहे. तुमचं एक मत खूप महत्त्वाचं असून तुमच्या एका मतामुळे मी खासदार होईन व माझ्या एका मतामुळे इंडिया आघाडीचा पंतप्रधान होणार आहे, असे ते म्हणाले.

या निवडणुकीत खूप पैसा खर्च केला जात आहे. पण मला जनतेवर विश्वास आहे. जनता कधीच पापाच्या व शापाच्या पैशाला हात लावणार नाही. निजामपूर विभाग कोणाची मक्तेदारी नाही. निजामपूरचा सात-बारा कोणाच्या नावावर लिहलेला नाही. मला ईडी, सीबीआयची भीती वाटत नाही. भीती वाटते तर ती जनतेची, असे गीते म्हणाले.

## महाविकास आघाडीच्या प्रचारात महिला रिंगणात



**पेण :** रायगडचे महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारामध्ये महिलांची विशेष उपस्थिती दिसून येत आहे. पेण शहरात महिलांनी प्रचारात आघाडी घेऊन डोअर टू डोअर प्रचार करायला सुरुवात केली आहे. या प्रचारामध्ये पेणकरांचा देखील उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. जिल्हा संघटीका दिपश्री पोटफोडे यांनी आमच्या वार्ताहरशी बोलताना सांगितले की, पेण शहरामध्ये गेल्या ५ वर्षात सुनील तटकरे यांनी एकही विकासाचे काम केलेले नाही. आज विकासाच्या गप्पा करताना पेण शहरासाठी सुनील तटकरे यांचे योगदान काय आहे हे त्यांनी सांगावे. त्यामुळे खरं पाहता पेणच्या जनतेजवळ मत मागण्याचा नैतिक अधिकारच त्यांना नाही. त्यामुळे पेणची जनता सुनील तटकरे यांना स्वीकारणार नाही, असे माझे ठाम मत आहे. कारण पेणकर सुज्ञ आहेत, पेणकरांना चांगले कोण वाईट कोण याचे आकलन आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्ये ज्यांनी सुनील तटकरे यांना मदत केली त्यांच्याकडे गरज फिटल्यावर त्यावर पाठ फिरवली आहे. त्यामुळे पेणच्या नेतृत्वाचे दरवेळी विश्वासघात करणाऱ्या तटकरेंना पेणकर मदत करणार नाही. असे शेवटी त्यांनी सांगितले.

## सुधागड तालुक्यात इंडिया आघाडीचा जोरदार प्रचार

**पाली :** रायगड लोकसभा इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या समर्थनार्थ पाली शहरातील मोहल्ला मधील कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रचाराकरीता सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी सुरेश खैरे, विष्णू पाटील, राजेंद्र राऊत, इम्तियाज पालकर प्रमुख नेत्यांसह पालीतील सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते. अत्यंत उत्साहात आणि एकदिलाने संविधान वाचवण्याकरिता पालीतील सर्व मुस्लिम बांधवांनी इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना बिनशर्त पाठींबा देण्यात आला. सुधागड तालुक्यात खेडोपाडीदेखील अनंत गीते यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. पाली शहरातील आगरआळी, भोईआळी, खालची बाजारपेठ, देऊलवाडा येथे प्रचार करताना इंडिया आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत.



# मतदानादिवशी खासगी, सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मावळ लोकसभा मतदारसंघासाठी १३ मे रोजी होणाऱ्या मतदाना दिवशी कामगारांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातर्फे एक दिवसाची पगारी सुटी जाहीर केली आहे. याची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित आस्थापनाविरोधात निवडणूक प्रशासनाकडे तक्रार करता येणार आहे. त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हा निवडणूक प्रशासनाने कामगार विभागाला दिल्या आहेत.

मावळ लोकसभा मतदारसंघाकरिता दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. या दिवशी प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजवावा, यासाठी प्रशासकीय स्तरावर जनजागृती करण्यात आली. त्यातच कामगार मतदारांना मतदान करता यावे यासाठी राज्य सरकारने परिपत्रकाद्वारे शुक्रवारी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यात कामगारांना मतदानासाठी दिवसभराची सुटी अथवा काही वेळ मतदानाला जाण्यासाठी दिला नाही तर याबाबत कामगारांना तक्रारसुद्धा करण्याचा अधिकार दिला आहे. निवडणूक क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी पगारी सुट्टी देण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

### पूर्ण दिवस सुटी किंवा सवलत

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रात कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र, त्याबाबत त्यांनी संबंधित महापालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक असणार आहे.

### यांना द्यावी लागेल सुट्टी



मतदानादिवशी सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने यांना सुट्टीचा नियम लागू राहील. राज्य सरकार, केंद्र सरकार व खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना, तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदी ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना मतदानासाठी सुट्टी द्यावी लागणार आहे.

### तक्रार कोठे कराल?

मतदारांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापना करण्यात आली आहे. तसेच तक्रार निवारण करण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे कामगारांना तक्रार नोंदविता येणार आहे.

# कर्जत नगरपरिषदेकडून कापडी पिशव्यांच्या माध्यमातून मतदारांची जनजागृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मतदारांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान केले पाहिजे यासाठी मतदान जनजागृती साठी कर्जत नगरपरिषदेकडून स्वीप अंतर्गत कापडी पिशव्यांचे माध्यमातून जनजागृती करण्यात आली. कापडी पिशव्या मतदारांना देवून त्यांना मतदान करण्याचे आवाहन कर्जत शहरात पालिका कर्मचारी करीत आहेत.




लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार राजा जागा हो या शीर्षकाखाली मतदार जनजागृती मोहीम हाती घेतली आहे.याच माध्यमातून मावळ लोकसभा मतदारसंघ मधील कर्जत विधानसभा मतदारसंघात कर्जत नगरपरिषदेमध्ये मतदार जनजागृती मोहीम राबविण्यात आली. शहरातील नागरिकांनी अधिक संख्येने मतदानाचा हक्क बजावावा यासाठी स्वीप चे अंतर्गत कापडी पिशव्यांवर संदेश लिहून त्या पिशव्यांचे वाटप मतदारांना करण्याचा उपक्रम आज पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक वैभव गारवे यांनी पालिका मुख्यालयात या मतदार राजासाठी संदेश असलेल्या पिशव्यांचे अनावरण केले.त्यावेळी पालिकेत जमलेल्या सर्व मतदारांना या कापडी पिशव्या देण्यात आल्या.

मतदार जनजागृती म्हणून नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी कापडी पिशव्यांची संकल्पना कर्जत नगरपरिषद राबवित आहे.

# कमी टक्क्यांचा सांगावा

दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी पार पडले. पहिल्या फेरीप्रमाणे या फेरीतही मतदारांचा उत्साह अतिशय कमी होता. महाराष्ट्रात सुमारे साठ टक्के मतदान झाले आहे. अयोध्येत राममंदिर बांधल्यामुळे यंदा राम आपल्याला तारून नेईल असे मोदींना वाटत होते. पण जनतेची रामावर असली तरी मोदींवरची श्रध्दा उडालेली दिसते. उत्तर प्रदेशात कालच्या टप्प्यात केवळ ५५ टक्के मतदान झाले. सर्व राज्यांमध्ये हा सर्वात कमी आकडा आहे. पहिल्या टप्प्यात हेच मतदान ६१ टक्के होते. म्हणजेच मतदारांचा उत्साह झपाट्याने खाली चाललेला दिसतो. महाराष्ट्रात २०१९ च्या तुलनेत फार नाही तरी मतदानामध्ये थोडी घट झालेली दिसते. बिहारमध्ये ५६ टक्के आणि मध्य प्रदेशातही सुमारे ५८ टक्के मतदान झाले आहे. २०१४ मध्ये बहुतांश भारतात मोदींची लाट होती. त्यामुळे ६५ ते ७० टक्के किंवा त्याहूनही अधिक मतदान झाले होते. पण त्या सर्व मतदारांनी मतदान न करून एका प्रकारे आपली नाराजी बोलून दाखवली आहे. लोकसभेच्या एकूण ५४३ पैकी १९० जागांवरचे मतदान कालच्या फेरीनंतर पूर्ण झाले. या बहुतांश जागांवर गेल्या वेळी भाजपचा वरचष्मा होता. काल मतदान झालेल्या ८८ पैकी तब्बल ५४ जागा भाजपकडे होत्या. यंदा मतदारांनी कोणाला कौल दिला आहे हे चार जूनला कळेल. पण या बहुतेक ठिकाणी सरासरी आठ टक्के मतदान कमी झाले आहे. घराबाहेर न पडून मतदारांनी भाजपच्या विरोधात आपला राग नोंदवला आहे. केरळ, राजस्थान, त्रिपुरा या राज्यांमधील सर्व जागांवरचे मतदान काल पूर्ण झाले. या तिन्ही राज्यांमध्ये २०१९ च्या तुलनेत मतदानामध्ये घट झाली आहे. केरळमध्ये दहा टक्के, राजस्थानात चार टक्के आणि त्रिपुरामध्ये तीन टक्क्यांनी मतदान खाली आली आहे. हा राग इथून पुढच्या टप्प्यांमध्येही वाढत जाणार आहे.

### विरोधकांनी विचार करायला हवा

२०१४ मध्ये मोदींची प्रतिमा भ्रष्टाचाराविरुध्द उभा राहणारा नेता अशी होती. शिवाय त्यांचे धर्माचे अपील अनेकांना आकर्षक वाटले. हे सरकार काम करणारे सरकार आहे असे मोदी वारंवार लोकांच्या मनावर बिंबवत असतात. त्यासाठी गेल्या दहा वर्षात हजारो कोटी रुपये जाहिरातींवर खर्च झाले. मात्र भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाल्याबद्दल किंवा मोदींचा डंका जगभरात वाजत असल्याबद्दल मतदारांना काहीच आनंद झालेला दिसत नाही. अन्यथा मोदींना मते देण्यासाठी ते स्वतःहून बाहेर आले असते. खरी स्थिती अशी आहे की मोदी काहीही बाता मारत असले तरी सामान्य जनतेला त्यांचा कोणताही प्रत्यय येत नाही. बेकारी आणि महागाई हे प्रश्न तीव्र आहेत. शेतकऱ्यांचे दुःखे वाढत चालली आहेत. भ्रष्टाचार कमी झाल्याचे कोणतेही लक्षण नाही. उलट निवडणूक कर्जरोखे, अदानी अशा प्रकरणांमुळे लोकांचा मोदींवरील विश्वास पुरता उडाला आहे. अर्थात असे असूनही मतदार विरोधी मते द्यायला का बाहेर पडले नाहीत याचा विरोधी पक्षांनी विचार करायला हवा. मोदी सरकारला काहीही करून पाडायचेच असा त्वेष मतदारांमध्ये उत्पन्न करण्यात ते यशस्वी झालेले नाहीत, असा त्याचा अर्थ होतो. २०१४ मध्ये मनमोहनसिंग सरकारच्या विरोधात असे मतदान झाले होते. त्यावेळी अण्णा हजारेंच्या आंदोलनात भाजप आणि संघाने हवा भरली होती आणि या सर्वांना मिडियाने उचलून धरले होते. आता मोदींच्या विरोधात शेतकऱ्यांनी वगैरे आंदोलन केलेच तर ते चिरडून टाकले जाते. दुसरीकडे बहुतांश वृत्तवाहिन्या या मोदींच्या दलाल बनल्या असून विरोधी पक्षांना प्रसिध्दी न देणे वा त्यांची बदनामी करणे हाच त्यांचा धंदा बनला आहे. अशा स्थितीत मोदीविरोधी मतदाराला मतदानकेंद्रापर्यंत खेचून आणण्यासाठी उर्वरित पाच टप्प्यांमध्ये विरोधकांना भरपूर कष्ट करावे लागणार आहेत. आजवर झालेले कमी मतदान ही स्पष्टपणे मोदी सरकारवरची नाराजी आहे. पण ती आपोआप मोदीविरोधी मतांमध्ये परावर्तीत होणारी नाही.

### भाजपने वातावरण बिघडवले

महाराष्ट्रात गेल्या चार वर्षात राजकारणाचा पुरता विचका झाला असून त्याला सर्वस्वी भाजप जबाबदार आहे. आधी भाजपने शिवसेनेची फसवणूक केली. नंतर उद्धव यांचे सरकार कपटाने पाडले. त्यांचा व शरद पवार यांचा पक्ष फोडला. फुटीर नेत्यांना आपल्या मूळ नेत्यांवर वाटेल त्या थराला जाऊन टीका करायला लावली. यामुळे राज्यातले वातावरण कधी नाही इतके गढूळ होऊन गेले. राज्यात शेकाप, डावे, समाजवादी इत्यादी कायम काँग्रेसी सत्तेच्या विरोधात होते. त्यामुळे काँग्रेसने यांच्यातले काही नेते फोडण्याचा प्रयत्न केला. पण विरोधी पक्षांना जगूच द्यायचे नाही, त्यांना पूर्ण नष्ट करायचे असले राजकारण राज्याने कधी पाहिले नव्हते. ते भाजपने जनतेला दाखवले. यामुळे ही जनता निराश व नाराज झाली असेल तर दोष तिचा नाही. निवडून कोणीही आले तरी फोडाफोडी करून भाजपच सत्तेत येणार असा एक समज तयार झाला आहे. विश्वासघातकी नेत्यांची एक पलटणच उभी राहिली आहे. त्यामुळे जनता कंटाळली आहे व तिने आपला निषेध कमी मतदानाद्वारे व्यक्त केला आहे. जनतेला तिच्या प्रश्नांची सोडवणूक हवी आहे. विरोधकांनी त्याबाबत ठोस उत्तरे दिली तर जनता त्यांच्यासोबत उभी राहील. महाविकास आघाडी रोजगार इत्यादींवर बोलण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र मोदी ही चर्चा पुन्हापुन्हा हिंदू-मुस्लिम वादाच्या अंगाने नेऊ पाहत आहेत. विरोधकांना इथे मोदींवर मात करावी लागेल. ठाकरे सेना व शरद पवारांची राष्ट्रवादी यांची दुसरी मोठी अडचण म्हणजे संघटनेतील बरेच मोठे नेते व कार्यकर्ते त्यांना सोडून गेले आहेत. त्यामुळे मतदारांना केंद्रांपर्यंत नेण्यासाठी जी यंत्रणा हवी तीच त्यांच्यापाशी नाही. ठाकरे सेनेला मुंबई व कोकणाच्या पट्ट्यात ही उणीव जाणवणार आहे. हे लक्षात घेऊन विरोधकांना उर्वरित टप्प्यांच्या प्रचाराची तयारी करावी लागेल. पहिल्या फेऱ्यांमध्ये कमी मतदान करून जनतेने आपला कल दाखवला आहे. त्याचा फायदा करून घेणे हे विरोधकांच्या हातात आहे.

**विचार**

# मतदान रंगले, सरशी कोणाची?

*एव्हाना मतदानाचे आकडे समोर येत असून मतदानाच्या तिसऱ्या टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र उमेदवारांमधील चुरस, पक्षांचे यशाचे दावे आदी लक्षात घेता ही निवडणूक इतिहासात वेगळी म्हणून नोंदली जाणार, यात शंका नाही. एकिकडे इंडिया आघाडीला वाढता प्रतिसाद मिळत असल्याचा दावा असताना कच्चा दुवा मागे न ठेवता जोरदार लढत देण्याचा भाजप आघाडीचा पवित्रा निवडणूक रंजक ठरत आहे.*



**प्रा. नंदकुमार काळे**

सार्वत्रिक निवडकांचे पर्व टप्प्याटप्प्याने सुरू झाल्यामुळे देशातील वातावरण ढवळून निघत आहे. सध्या अनेक घटना लक्षवेधी ठरत आहेत. अलिकडेच समाजवादी पक्ष, काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, तृणमूल काँग्रेस आदी पक्षांनी मतचाचण्यांवर बंदी घालण्याची मागणी केली. यावर प्रतिक्रिया देताना विरोधी पक्ष पराभवाला घाबरले असून मतचाचण्यांना विरोध करणे गैर असल्याचे भारतीय जनता पक्षाने म्हटले असले, तरी या पक्षानेही अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना मतचाचण्यांवर बंदी घालण्याची मागणी करणारा अध्यादेश आणण्याचा प्रयत्न केला होता, हे विसरता येणार नाही. निवडणूक जाहीर झाल्यानंतर मतचाचण्या घेऊ नयेत, असे २००४ मध्ये सर्वपक्षीय बैठकीत ठरले होते; परंतु पुढे त्यावर काहीच झाले नाही. मतदार विवेकबुद्धीनुसार अंतिम निर्णय घेतो आणि बरेचदा जागरूक मतदार सर्वेक्षणकर्त्यांना आश्चर्यचकितही करतो. म्हणजेच ओपिनियन पोल अनेकदा चुकीचे असतात, हे खरे असले तरी काही वेळा ते बरोबरही असतात. २००९ मध्ये कोणत्याही सर्वेक्षणात कोणीही काँग्रेसच्या पुनरागमनाचा अंदाज व्यक्त केलेला नव्हता. २००४ मध्येदेखील भाजपच्या 'इंडिया' शायनिंग मोहिमेमुळे तोच पक्ष पुन्हा सत्तेत येईल, अशी आशा व्यक्त केली होती. पण तसे झाले नाही.

सध्या देशातील जनतेचा 'मूड' काय आहे हे सांगण्याची स्पर्धा लागली आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या सात-आठ महिने अगोदरपासून जनता कोणाला सरकार बनवण्याची संधी देणार याची सर्वेक्षणे वेगवेगळ्या संस्था करत असतात. आता 'सेफॉलॉजी' हे एक शास्त्र झाले असून आकडेवारीचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केल्यास मतचाचण्यांमध्ये अचूकता येऊ शकत असल्याचे मानले जाते. अर्थातच मतचाचण्यांचे निष्कर्ष कुणालाच मान्य नसतात. उदाहरणार्थ, भाजपाला देशभरात ३७० च्या पुढे जागा मिळू शकतात, हा अंदाज या पक्षाला सुखावणारा असल तरी महाराष्ट्र, कर्नाटकमध्ये त्यांच्या जागा कमी होऊ शकतात, हा अंदाज त्यांना मान्य नाही. तीच गोष्ट अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची. या पक्षाला राज्यात एकही जागा मिळणार नाही, असे विश्लेषकांचे मत असले तरी या पक्षाच्या नेत्यांना ते कदापि मान्य होणे नाही. तिकडे ममता बॅनर्जींनी तर मतचाचण्यांवर विश्वास ठेवू नका, असेच कार्यकर्त्यांना सांगितले आहे.

देशभरात वेगवेगळ्या संस्था मतचाचण्या घेतात. वृत्तपत्र आणि वाहिन्याही मतचाचण्या घेतात; परंतु या सर्वांवर आता भाजपच्या दावणीला बांधले गेल्याचा आरोप होत आहे. या सर्वेक्षण माध्यमातून मोठी उलाढाल होत असते. असे असले, तरी मतचाचण्यांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. त्याचप्रमाणे त्यांनी दिलेल्या आकड्यांची बेरीज केली तर ती बऱ्याचदा निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त होते. देशात मतचाचण्या कोणत्या वेळी घेतल्या जातात, त्यात किती लोकांची मते आजमावली जातात आणि प्रत्यक्ष मतदान किती होते, यावर मतचाचण्यांची अचूकता अवलंबून असते. त्यातच भारतीय जनमानस वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होतो. एकूण मतदात्यांमधून काही ठराविक लोकांची मते विचारात घेऊन केलेल्या मतचाचण्या कधी कधी चुकू शकतात; परंतु बऱ्याचदा अंदाजाचा लोलक एका टोकाकडे जात असेल, तर या चाचण्यांच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होतो. २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार पुन्हा येईल, असे सांगितले जात होते. परंतु प्रत्यक्षात या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला. गेल्या वर्षी मध्य प्रदेशाबाबतचा अंदाजही चुकीचा ठरला. तेलंगणामध्ये भारत राष्ट्र समितीचा पराभव होईल, असे फक्त एकाच सर्वेक्षणामध्ये म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर, सध्या व्यक्त होत असणाऱ्या अंदाजांवरुन पुन्हा एकदा भाजप पूर्ण बहुमताने सरकार स्थापन करत असल्याचे दिसत आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये भाजप पुन्हा एकदा 'क्लीन स्वीप' करणार असल्याचे चित्र मांडले जात आहे. अर्थात मतचाचण्यांमध्ये तसे म्हटले जात असले तरी त्यांना मिळू शकणाऱ्या जागांच्या अंदाजात किमान ४० जागांचा फरकही दिसतो आहे. 'न्यूज १८' च्या मेगा ओपिनियन पोलमध्ये 'एनडीए' आघाडीला ४०० च्या आसपास जागा मिळतील, असे म्हटले आहे. उत्तर भारतातील राज्यांमध्ये तसेच दक्षिणेतील काही राज्यांमध्ये भाजपची चांगली कामगिरी होताना दिसत आहे.

काही ओपिनियन पोलमध्ये भाजपला केरळमध्ये एकही जागा मिळणार नसल्याचे म्हटले आहे, तर काहींनी तिथे भाजपला तीन-चार जागा दाखवल्या आहेत. बहुतांश मतचाचण्यांमध्ये कर्नाटकमध्ये भाजपला गेल्या पाच वर्षांपूर्वीसारखी कामगिरी करता येणार नाही, असे म्हटले असले तरी एका मतचाचणीत भाजपला 'इंडिया' आघाडीपेक्षा जास्त जागा दाखवल्या गेल्या आहेत. 'सी व्होटर'ने 'एबीपी न्यूज'साठी केलेल्या सर्वेक्षणात 'एनडीए'ला सर्व जागांवर ४७ टक्के मते मिळण्याची शक्यता वर्तवली आहे तर 'इंडिया' आघाडीला ४० टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. इतरांना १३ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. या मतचाचणीत 'एनडीए'ला ३७३ जागा, 'इंडिया' आघाडीला १५५ जागा आणि इतरांना १५ जागा दाखवल्या आहेत. काहींनी तर 'इंडिया' आघाडीला नव्वदच्या आत आणून ठेवले आहे. मात्र दोन टक्क्यांच्या फरकानेही अनेकदा चमत्कार घडले आहेत. अशा परिस्थितीत सहा टक्के मतदान कमी झाले, तर कुणाला फटका बसणार याचा विचार मतचाचणी करताना झालेला दिसत नाही.

असे सगळे असताना मतचाचण्या घेण्यावर बंदी घालण्याचा आदेश द्यावा, अशी काँग्रेसची मागणी लक्षात घ्यायला हवी. एका दूरचित्रवाणी वाहिनीने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये काही संस्था पैशांसाठी चाचण्यांच्या निष्कर्षांमध्ये फेरफार करत असल्याचे आढळले. या ऑपरेशनमुळे अशा प्रकारच्या अकरा संस्थांचे पितळ उघडे पडल्याचा दावा सदर वाहिनीने केला होता. त्यामुळे सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकांच्या वेळीदेखील हितसंबंधीयांकडून अशा भानगडी होण्याची सहाजिक शंका व्यक्त केली जात आहे. मात्र निवडणूक आयोगाने या प्रकारांमध्ये हस्तक्षेप केला नव्हता.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे आजकाल अनेक दूरचित्रवाणी वाहिन्या सरकारच्या हस्तक असल्यासारख्या वागत आहेत. म्हणूनच सर्वच राजकीय पक्षांनी जनमत चाचण्यांवर बंदी आणावी, अशीच मागणी केली आहे. मात्र जगातील बहुतेक देशांमध्ये जनमत चाचण्या होतच असतात. अर्थात मतदानाच्या आधी काही दिवस त्यावर निर्बंध आणले जातात. ब्राझील, तुर्कस्तान, पोलंड, फ्रान्स, इटली, कॅनडा या सर्व देशांमध्ये असे निर्बंध आणले जातात. याचे कारण अनेक चाचण्या अपारदर्शक पद्धतीने घेतल्या जातात. कोणत्या पद्धती वा प्रक्रियेने त्या घेण्यात आल्या आहेत, याची पुरेशी माहिती दिली जात नाही. अनेकदा मतदारांना प्रभावित करणे हाच त्यामागील हेतू असतो. 'काँटे की टक्कर' असते तेव्हा तर मतचाचण्या घेऊन त्यांच्या निष्कर्षांच्या आधारे प्रचंड मतांनी निवडून येण्याची शक्यता व्यक्त केली जाते.

यापूर्वी १९९७ आणि २००४ मध्ये सर्व राजकीय पक्षांनी एकमताने जनमत चाचण्यांवर बंदीची मागणी केली होती. २००८ मध्येही 'एक्झिट पोल'वर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली. निवडणूक आयोगात जाऊन एक बोलायचे आणि प्रत्यक्षात मात्र तसा कायदा करायचा नाही, हा राजकीय पक्षांचा दुटप्पीपणाच होता. खरे तर, 'प्रेस कौन्सिल'नेही जनमत चाचण्यांच्या सच्चेपणाबद्दल शंका उपस्थित केली होती. या क्षेत्राचा अनेक वर्षांचा अनुभव असलेले योगेंद्र यादव यांनी कशा पद्धतीने चाचणी घेतली याची सर्व माहिती जनतेसमोर ठेवण्याची मागणी केली होती.

जनमत चाचण्यांचा प्रायोजक कोण आहे, किती लोकांच्या मुलाखती घेतल्या, त्या कोणत्या कालावधीत घेतल्या, मुलाखती घेणारे आणि त्याचा अन्वयार्थ लावणारे कर्मचारी प्रशिक्षित आहेत की नाहीत, ही सर्व माहिती लोकांना कळाली पाहिजे. ब्रिटनमध्ये पोलिंग कौन्सिल आहे; तशा प्रकारची यंत्रणा भारतातही स्थापन करता येईल. ती या चाचण्यांचे नियामक प्राधिकरण म्हणून काम करू शकेल. मतदान चाचण्यांच्या प्रक्रियेची विश्वासार्हता प्रस्थापित करण्यासाठी या प्रकारचे पाऊल उचलणे अत्यावश्यक आहे. मतचाचण्या किंवा 'एक्झिट पोल'च्या अंदाजांना कधीही अंतिम निकाल मानले जाऊ नये, कारण ते यशस्वी किंवा अयशस्वी होण्याची ५० टक्के शक्यता असते. काही वेळा निवडणुका घेणाऱ्या संस्थांची कार्यपद्धती, प्रश्नांची वेळ किंवा शब्दांची निवड या बाबतीत पक्षपात होऊ शकतो. थोडक्यात, समूहाचे लोकसंख्याशास्त्रीय वर्तन, आर्थिक परिस्थिती आणि इतर घटकांनुसार ऐन वेळी परिस्थिती बदलू शकते. त्यामुळे वाट पाहणे उत्तम.

**आजकाल**

# वर्षा गायकवाड चमत्कार करणार?



लोकसभा २००४ निवडणुकीत मुंबईतील उत्तर मध्य मुंबईत लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष मनोहर जोशी विरुद्ध काँग्रेसचे एकनाथ गायकवाड यांच्यात लढत होती. शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या या मतदारसंघातून मनोहर जोशी यांचा विजय निश्चिच मानला जात होता. पण काँग्रेसच्या एकनाथ गायकवाड यांनी चमत्कार केला. गायकवाड 'जायंट किलर' ठरले. मतदारसंघाची सीमा बदलेल्या या मतदारसंघात गायकवाड यांची कन्या मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड या वडिलांचा कित्ता गिरविणार का, याची उत्सुकता आहे. त्यांच्या विरोधात भाजपने वकील उज्वल निकम यांना उतरवले आहे.

उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून काँग्रेसने वर्षा गायकवाड यांची उमेदवारी जाहीर केली. वास्तविक गायकवाड यांची दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघातून लढण्याची इच्छा होती. कारण या मतदारसंघात त्यांचा धारावी मतदारसंघाचा समावेश होतो. उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात वांद्रे पूर्व व पश्चिम, विलेपार्ले, चांदिवली, कुर्ला आणि कलिना या विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. मराठी, उत्तर भारतीय, मुस्लीम, दलित, गुजराती अशा संमिश्र वस्तीचा हा मतदारसंघ आहे. मराठी, महिला आणि दलित असा तिहेरी लाभ उठविण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात पूर्वीचा वायव्य मुंबईचा बहुतांशी भाग समाविष्ट होतो. तेव्हा वायव्य मुंबई मतदारसंघावर काँग्रेसचे वर्चस्व होते. सुनील दत्त, त्यानंतर त्यांची कन्या प्रिया दत्त हे निवडून आले होते. पण २०१४ आणि २०१९ मध्ये भाजप नेते कै. प्रमोद महाजन यांची कन्या पूनम महाजन या मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. वांद्रे पूर्व, चांदिवली. कुर्ला आणि कलिना हे चार मतदारसंघ काँग्रेस किंवा महाविकास आघाडीसाठी अनुकूल आहेत. वांद्रे पश्चिम, विलेपार्ले या दोन मतदारसंघांमध्ये भाजपचा वरचष्मा आहे. यामुळे या मतदारसंघातील लढत चुरशीची होऊ शकते.

उत्तर मध्य मुंबईत मुस्लीम मतदारांचे प्रमाण लक्षणिय आहे. सुमारे चार लाखांपेक्षा अधिक मुस्लीम मतदार आहेत. यातूनच भाजपकडून मुस्लिम मतांचे विभाजन करण्याचा प्रयत्न होण्याची चिन्हे आहेत. काँग्रेसमध्ये माजी मंत्री नसिम खान हे इच्छूक होते. पण त्यांना उमेदवारी मिळालेली नसल्याने त्यांची भूमिका काय राहिल यावरही गायकवाड यांचे भवितव्य अवलंबून असेल. या मतदारसंघात सुमारे पावणे तीन लाख उत्तर भारतीय तर दोन लाखांच्या आसपास गुजराती, मारवाडी मतदार आहेत. या मतांवर भाजपची भिस्त असेल

मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांना भाजप नेत्यांनी येथे निवडणूक लढविण्याचा आग्रह केला. पण त्यांना महाराष्ट्रातील राजकारणातच रहायचे असल्याने त्यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला. त्यामुळे अन्य नावांबरोबरच भाजपने उज्वल निकम यांच्याबाबतही विचार केला व त्यांना उमेदवारी देण्याचे निश्चित केले. मुंबईतील १९९३ चे साखळी बाँबस्फोटातील अतिरेकी आणि मुंबईवरील हल्ल्यातील अतिरेकी अजमल कसाब यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी निकम यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. ज्येष्ठ भाजप नेते प्रमोद महाजन यांच्या हत्या प्रकरणातही निकम यांनी पोलिसांसाठी बाजू मांडली आहे.

निकम यांनी देशविरोधी कारवायांमधील अतिरेक्यांना शिक्षा होण्यासाठी बजावलेल्या भूमिकेचा या मतदारसंघात चांगला राजकीय उपयोग होईल, असे भाजपला वाटत आहे. त्यामुळेच मुंबईतील भाजपच्या विजयासाठी सर्वाधिक कठीण मतदारसंघात भाजप राजकारणात नवख्या उमेदवाराचा पर्याय अजमावणार आहे. मात्र निकम यांच्या काही लंगड्या बाजूही असून त्यांच्याविरोधात मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे निकम यांना विजय मिळविणे अवघडच असणार आहे.

**लोकसंसद**

## अजितदादांना साक्षात्कार झाला?

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कोट्यावधी रुपयांचा शिखर बँक व सिंचन घोटाळ्याचा ईडीमार्फत तपास सुरू आहे. त्यांच्या ह्या घोटाळ्यामुळे, तेव्हाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर अनेक आरोप करून तांडव केले. इतकेच नव्हे तर त्यांना तुरूंगात चक्की पिसायला पाठवणार होते. तर देशाचे बाहुबली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर, महाराष्ट्रात येऊन त्यांच्यावर कोट्यावधी रूपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप करून वाभाडे काढले. यावरून आता तुरूंगात जाण्याशिवाय पर्याय नाही असे दिसताच पक्षातील खासदार आमदारांना फोडून भाजप सरकारच्या युतीत ते सामील झाले. तेव्हापासून त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या देशाचे अवतार पुरूष, जगद्गुरू वगैरे असे वाटायला तर, लागेलच पण ते जगात लोकप्रिय असे नेते असून अशी माणसे सतत जन्माला येत नसतात. मोदी ही एक दैवी शक्ती आहे. मी राजकारणात अनेक नेते पाहिले. पण मोदींसारखा नेता नाही. अशी स्तुतीसुमने अजित पवारांनी उधळून मोदी अंध भक्तांच्या यादीत प्रथम क्रमांक पटकाविला. हा अजितदादांना थोड्याच दिवसात आलेला साक्षात्कार समजावा की भाजपाचा चमत्कार समजावा.

**- राजेंद्र लकेश्री, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**अठ्ठावीस एप्रिल**

**१८२७ :** विष्णू परशुरामशास्त्री पंडित ग्रंथकार, पत्रकार, समाजसुधारक, वि.प. पंडित यांचा जन्म १८२७ साली झाला. प्राचीन गुरुकुल पद्धतीनुसार संस्कृत व्याकरण आणि न्यायशास्त्रा अध्ययन केल्यानंतर पुण्यात सरकारी पाठशाळेत इंग्रजी शिक्षणासाठी झाले. अत्पावधीत इंग्रजी विद्या आत्मसात केल्यावर सरकारी शिक्षकाची नोकरी पत्करली. मॅकडोनात्डकृत 'कॉर्निकल ऑफ नाना फडणवीस' च्या आधारे नाना फडणवीस यांची संक्षिप्त बखर त्यांनी लिहिली. यानंतर 'इंग्रजी-मराठी कोश' आणि 'संस्कृत महाराष्ट्र धातूकोश' त्यांनी तयार केले. मरेकृत 'द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया' चे हिंदुस्थानचा इतिहास या नावाने भाषांतर केले. मराठी साहित्याच्या दृष्टीने त्यांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे शं.पां. पंडित यांच्या सहकार्याने त्यांनी वेगवेगळ्या पोथ्या पाहून त्यातील ४५०३ अभंग निवडून 'तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा' त्यांनी संपादित केली. पंडितांनी नोकरीचा राजीनामा देऊन इंदूप्रकाशचे संपादकपद स्वीकारते. इंदूप्रकाशमधून बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, जाचक जातीव्यवस्था आदी सामाजिक विषयांवर ताशेरे ओढते. मिशनरी वृत्तीने गावागावांतून फिरून आपल्या विचारांचा प्रचार केला. त्यांची व्याख्यानेसुध्दा ग्रंथरूपाने प्रसिद्ध आहेत. भाषांतरकार म्हणून काम करत असताना त्यांनी पाच शालेय ग्रंथ लिहिते. समाजसेवा करताना विधवा रोजी त्यांना देवाज्ञा झाली. विवाहाच्या चळवळीत त्यांनी आपले आयुष्य झोकून दिले. **१८९२:-** दै.ज्ञानप्रकाशचे संपादक आणि मराठी पत्रकार परिषदेचे पहिले अध्यक्ष कृष्णाजी गणेश लिमये उर्फ काकासाहेब यांचा जन्म. त्यांचे बरेचसे लेखन 'ज्ञानप्रकाशकार लिमये' या पुस्तकात समाविष्ट आहे. **१८९८:-** लेखक, कवी गणेश सदाशिव लेले यांचे निधन. राजशेखरांची 'कर्पूरमंजिरी', कालिदासाची 'मालविकाग्नि मित्र' आणि 'रघुवंश' या त्यांच्या भाषांतरांना दक्षिण प्रेज कमिटीचे पारितोषिक, 'श्रीशिवाजी चरित्र' व 'कृष्णकुमारी' ही त्यांची स्वतंत्र काव्यरचना. त्यांचे उल्लेखनीय ग्रंथरचना म्हणजे आद्यशंकराचार्यां 'अमरशतका'चा पद्यमय अनुवाद, 'तीर्थयात्रा प्रबंध' हे प्रवासवर्णन आणि 'साहित्यशास्त्र' हा व्याकरण विषयक ग्रंथ याशिवाय ग्रीक पुराणातल्या गोष्टी आणि कप्तान कूकसाहेब ह्यांच्या जलपर्यटनाचा वृत्तांत ही पुस्तके त्यांनी भाषांतरीत केली. **१९००:-** ग्रंथकार, संस्कृत साहित्याचे संशोधक विष्णू प्रभाकर लिमये यांचा जन्म. 'अल्वेरुणीची गीता व इतर निबंध' ह्या ग्रंथासह व्याकरणशास्त्रावर 'महाभाष्यदीपिका', कौशिकसूत्रावर 'दाटिल भाष्य' आणि 'क्रिटिकल स्टडीज ऑन महाभाष्य' ह्या ८०० पृष्ठांचा ग्रंथ तसेच काही संघटित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९०६:-** आधुनिक मराठी काव्याचे व्यासंगी, कवी, समीक्षक भवानीशंकर श्रीधर पंडीत यांचे निधन. 'पिचलेला पावा', 'उन्मेष आणि उद्रेक', 'सुवास आणि रस' ह्या काव्यसंग्रहासह 'आधुनिक मराठी कविता', 'समग्र केशवसुत', 'संत समागम', 'संचय', 'महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे' इ. पुस्तके. तसेच 'बीजेची कोर', 'पूर्णिमेचे चांदणे', 'सदाफुली' हे बालगीत संग्रह. 'ऐकलेल्या गोष्टी' हा लहानमुलांसाठीचा कथासंग्रह अशी साहित्यसंपदा. **१९१४:-** संतसाहित्याचे गाढे अभ्यासक लेखक रामचंद्र विष्णू माडगावकर यांचे निधन. ज्ञानदेवकृत 'भावार्थदीपिका ज्ञानदेवी' हा त्यांनी संपादित केलेला महत्त्वपूर्ण ग्रंथ. हा ग्रंथ माडगावकर प्रत म्हणूनही प्रसिध्द आहे. याशिवाय 'तुकारामाची गाथा' हा ग्रंथ तुकारामांचे वाचनीय चरित्र जोडून प्रसिध्द केले. तसेच 'रामदासस्वामींचा समग्र ग्रंथ' त्यांनी संपादित केला. **१९२८:-** कथा-कादंबरी-नाटककार वसंत नरहर फेणे यांचा जन्म. 'काना आणि मात्रा', 'पाण्यातील लेणी', 'सावल्यांची लिपी', 'पंचक आई' हे कथासंग्रह तर 'हे झाड जगावेगळे', 'पहिला अध्याय', 'अ-जोड', 'संदर्भ', 'ऱ्हास-पर्व' या कादंबऱ्या. 'मी पुरुष-पूर्ण पुरुष' हे नाटक, 'वैतागवानोळा' हे विनोदी पुस्तक तसेच 'साम्यवाद आणि पितापुत्र', 'निर्वासित नाती' हे अलिकडचे कथासंग्रह. माणसांबद्दलची कळवळ हा त्यांच्या लेखनाचा मुख्य गाभा. ६ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. **१९३३:-** चतुरस्त्र मराठी साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांचा जन्म. 'कोकणी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. यानंतर 'तोरण', 'पारध', 'मंत्र', 'केवडा', 'अनिकेत', 'वेचक मधू मंगेश कर्णिक' असे ३८ कथासंग्रह, 'देवकी', 'सूर्यफूल', 'माहिमची खाडी', 'भाकरी', 'वावटळ', 'कातळ' अशा ९ कादंबऱ्या, 'सोबत', 'जिवाभावाचा गोवा', 'माझा गाव माझा मुलूख' हे ललित लेख. 'देवकी', 'केला तुका झाला माका' ही नाटके, 'शाळेबाहेरील सोंगडी', 'जगन्नाथ आणि कंपनी' ही बच्चे कंपनीसाठी पुस्तके, तर 'लघुउद्योग' हे तंत्रविषयक पुस्तकही त्यांनी लिहिले आहे. 'दूत पर्जन्याचा' हे त्यांचे आत्मचरित्र आहे. त्यांच्या लेखनातून निसर्गरम्य कोकणाच्या वर्णनाबरोबर माणसाविषयी वाटणारे ममत्व, भाववृत्तीतील जिव्हाळा, ओथंबलेपणा प्रकट होतो.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ एप्रिल
१) श्री. कृष्णकांत माधवराव मोरजकर
अलिबाग, २९-४-१९४१

# अवैध एलईडी मासेमारी मच्छिमारांच्या मुळावर

## कोकण किनारपट्टीवरील दर्याचा राजा पुन्हा संकटाच्या खाईत

**। कोर्लई । वार्ताहर ।**

सातत्याने हवामानात होणारे चढ-उतार, ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम यामुळे राज्याच्या संपूर्ण कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मच्छीचा दुष्काळ पडला असून, दर्याचा राजा संकटाच्या खाईत लोटला आहे. खोल समुद्रात होणारी अवैध एलईडी मासेमारी पारंपरिक मच्छिमारांच्या जीवावर कर्दनकाळ ठरते आहे. यामुळे मुरुड-जंजिरा पर्यटनात फिरायला येणाऱ्या पर्यटकांच्या खवय्येगिरीवर विरजण पडले आहे.



वारंवार होणारे हवामानातील बदल याबरोबरच समुद्रातील वाढते जलप्रदूषण, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप, अवैध एलईडी-पर्ससीन मासेमारीमुळे दिवसेंदिवस समुद्रातील माशांचे उत्पादन घटत चालले आहे. राज्याच्या ७२० कि.मी. लांबीच्या समुद्रकिनारपट्टीवर असलेला दर्याचा राजा गेली कित्येक वर्षे मासळी दुष्काळाच्या कचाट्यात सापडत चालला असून, संकटाच्या खाईत लोटला आहे. तो मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

सागरी मासेमारीला तर मुळातच अनेक मर्यादा आहेत. त्यातच समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे अनेक प्रजातींचे मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडत आहेत. तर, काही प्रजाती स्थलांतर करीत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळेही माशांसह समुद्रातील एकंदरीतच जीवसृष्टीवरच अनिष्ट परिणाम होत आहेत.

अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील काही भागांमध्ये झीरो ऑक्सिजन झोन निर्माण झाले आहेत. त्यामुळे अशा भागांतून काही प्रजातींचे मासे इतरत्र स्थलांतरित होत आहेत. घोळ, जिताडा, शेवंड, बोंबील, मांदेली, कर्ली, कोळंबी, पापलेट, सुरमई तसेच खेकडे याचबरोबर इतर अनेक प्रजातींचे समुद्रातील अस्तित्व काही वर्षांपासून कमी झाले आहे. त्याचबरोबर बेकायदेशीर पर्ससीन, एलईडी मासेमारीच्या अतिरेकाचा मोठा परिणाम पारंपरिक मच्छिमारांच्या आर्थिक स्थितीवर झाला आहे.

> समुद्रात मिळणारी थोडीफार कोळंबी गायबच झाली असून, मोठी मासळी तर दिसेनाशी झाली आहे. याला जबाबदार अवैध एलईडी मासेमारी व पर्ससीन मासेमारी आहे. यांच्यामुळे समुद्रातील लहानसहान जीव नष्ट होत असल्याने उत्पादन घटत आहे.
> – रोहन निशानदार, स्थानिक मच्छिमार

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**




# तळा महावितरणकडून कोट्यवधींची वसुली

## एक कोटी तीन लाखांपैकी ८९ लाख रुपये जमा

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यात महावितरण विभागाने युद्धपातळीवर वीज बिल वसुली मोहीम सुरू केली असून, सध्या नागरिकांकडून थकित वीज बिल वसुलीचा तगादा लावला आहे. ज्या नागरिकांचे वीज बिल बाकी आहे अशा नागरिकांकडून महावितरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत वीज बिल वसुली करण्यात येत असून, वेळेत वीज बिल न देणाऱ्या ग्राहकांचे वीज कनेक्शनदेखील तोडण्यात येत आहे.

आधीच दररोजच भारनियमन व महागाईने त्रस्त झालेल्या नागरिकांना या महिन्यात वीज बिलासोबत अतिरिक्त ठेवी शुल्कदेखील आकारण्यात येणार आहे. तसेच ही सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम भरली नाही तर ग्राहकांचे वीज कनेक्शन तोडण्यात येणार असल्याचा इशाराही महावितरणकडून देण्यात आला आहे. सध्या तळा तालुक्यात घरगुती ११,९८४, व्यावसायिक ३५४, औद्योगिक ७७ व कृषी २६५ अशी मीटर संख्या आहे. यातील एकूण १४ लाख रुपये थकबाकी ग्राहकांकडून महावितरण विभागाला येणे आहे.

> नागरिकांनी आपले वीज बिल वेळेत भरून महावितरणला सहकार्य करावे. जे ग्राहक वेळेत वीज बिल भरणार नाहीत, अशा ग्राहकांना नोटीस बजावून त्यांचे वीज कनेक्शन तोडण्यात येईल.
> – के.डी. महिंद्रीकर, उपकार्यकारी अभियंता, तळा

# राजमाता जिजामाता तलावात जाळला जातोय कचरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातील ग्रामस्थांचे सकाळी आणि संध्याकाळी मनोरंजनाचे ठिकाण म्हणून राजमाता जिजामाता तलाव ओळखला जातो. या तलाव परिसरात नेरळ गावातील ज्येष्ठ, वयोवृद्ध आणि महिला या चालण्यासाठी गर्दी करून असतात. मात्र, याच तलाव परिसरात दररोज कचरा जाळण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीचे कर्मचारी त्या ठिकाणी झाडांच्या फांद्या आणि पालापाचोळा असा सर्व कचरा तेथेच जाळतात आणि सतत त्या ठिकाणी धुराचे लोट दिसून येतात, त्यामुळे प्रदूषणमुक्त वातावरण बिघडण्याचे काम ग्रामपंचायत कर्मचारी करताना दिसत आहेत. त्याबद्दल काही ज्येष्ठ नाराजी व्यक्त करीत आहेत.



१९९९ मध्ये नेरळ ग्रामपंचायतीने राजमाता जिजामाता भोसले तलावाची निर्मिती केली. या तलावाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे असून, त्या झाडांचा पालापाचोळा पाण्यात पडून पाणी दूषित होत होते. त्यावेळी तलावाच्या जलाशयाजवळ असलेली झाडे ही काही प्रमाणात तोडण्यात आली. पण, झाडांच्या छायेत राजमाता जिजामाता तलाव उभा आहे. सातत्याने त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपात वृक्षारोपणदेखील केले जात असते.

सर्वत्र कचरा जाळण्यास बंदी असून, गोळा करण्यात आलेला कचरा हा प्रक्रिया करण्यासाठी घकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे पाठवण्यात यावा, अशी रचना आहे. नेरळ ग्रामपंचायतीमध्ये झाडाचा पालापाचोळा हा कुठेही घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे पाठविला जात नाही. नेरळ ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांचे नियंत्रण या सर्व प्रक्रियेवर आणि घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विशेष लक्ष असायला हवे. मात्र, ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून कोणतेही नियंत्रण ग्रामपंचायत आणि कर्मचाऱ्यांवर नाही असे दिसून येत असल्याचा आरोप केला जात असून, तलाव परिसरात कचरा जाळला जात असल्याबद्दल बोलत आहेत.

## आरटीओची नवीन मालिका

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नवीन खासगी दुचाकी वाहनांसाठी एमएच-४६ सीएस ही नवीन मालिका लवकरच सुरु होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे. या मालिकेतील आकर्षक, अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५७अ नुसार विहित केलेले आकर्षक नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.

# जिल्हा रुग्णालयात युरोलॉजी, ओरल कॅन्सर

## इंटरवेंशनल रेडिओलॉजीच्या उपचारांना सुरुवात

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे रुग्णांना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या सेवांकरीता सामंजस्य कराराद्वारे अतिविशेषतज्ज्ञांच्या सहकार्याने युरोलॉजी (मूत्रविकार), ओरल कॅन्सर (मुख कर्करोग) व इंटरवेंशनल रेडिओलॉजीच्या संदर्भातील रुग्णाना बाह्य रूग्ण विभागात मोफत सेवा सुरू करण्यात आली आहे.

मूत्रमार्गसंस्थेशी निगडित असलेले मुख्य आजार जसे की, वयोमानाने पुरुषांमध्ये आढळणारा प्रोस्टेट ग्रंथीचे आजार, आपल्या परिसरात सामान्य असणारा मुतखडा, स्त्रियांमध्ये वारंवार होणारे लघवीचे संसर्ग तसेच लहान मुलांमध्ये जन्मतः असणारे मूत्रमार्गाचे विकार याबाबत योग्य मार्गदर्शन, उपचार व सल्ला देणेसाठी अलिबागमधील प्रसिद्ध मूत्रशल्यचिकित्सक डॉ. दशरथ घुगे हे आठवड्यातील दर गुरुवारी दुपारी दोन वाजता जिल्हा रुग्णालयातील ओपिडी क्रमांक ०८ येथे सेवा देत आहेत. तर, पायातील रक्तवाहिनी संदर्भाजरल आजार, डायलेसिससाठी आवश्यक वृक्कविकारशास्त्र, न भरणारी जखम, स्तन, फुफ्फुसातील जखमांसंदर्भात बायोप्सी व तपासणी तसेच यकृत, हातापायातील रक्तवाहिनी, मेंदूतील रक्तस्राव व स्ट्रोक संदर्भातील तपासणी करण्यासाठी डॉ. अक्षय गुरसाळे, रक्तवाहिनी चिकित्सक हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरुवारी दुपारी दोन वाजता जिल्हा रुग्णालयातील ओपिडी क्रमांक ०३ येथे सेवा देत आहेत. तसेच मुख कर्करोग संबंधित तपासणी व उपचार तसेच मुख कर्करोग पूर्व होणारे आजार जसे की, पांढरा चट्टा, लाल चट्टा, तोंड न उघडणे, तोंडातील न भरणारी जखम, मुख कर्करोग निदान व शस्त्रक्रिया, जबड्याचे फ्रॅक्चर, अपघातग्रस्त रुग्णांच्या जबड्यावरील तसेच जबड्यातील गाठीची उपचारशस्त्रक्रिया व खालच्या जबड्याचे जॉइन्ट संबंधित आजारवर निदान व उपचार करण्यासाठी मुख कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. सौजन्य सुहास साईकर हे महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी सकाळी दहा वाजता जिल्हा रुग्णालयातील ओपीडी क्रमांक १५ येथे सेवा देत आहेत. तरी वरील सर्व आजारासंदर्भात निगडीत रुग्णांनी या मोफत उपचार व सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांनी केले आहे.

पान १ वरुन

## अबकी बार ४०० पार अशक्य

नाशिकसाठी सुचवले होते. त्याप्रमाणे मी मनाची तयारी केली होती. पण, इतर मतदारसंघात उमेदवारी जाहीर होत असताना नाशिकचा निर्णय मात्र होत नव्हता. त्यामुळे मी अखेर माघार घेतली. कारण, मी उमेदवारीसाठी रडत बसणारा नाही. मी महानगरपालिकेसाठी बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पहिल्यांचा उमेदवारी मागितली होती. त्यानंतर माझ्यावर कधीही निवडणुकीची उमेदवारी मागण्याची वेळ आली नाही. त्यामुळे या पातळीवर येणे, मला पसंत नव्हते, म्हणून मी माघार घेतली असे भुजबळ म्हणाले.

## जरांगेंचा सरकारला पुन्हा अल्टिमेटम

सर्व २८८ जागा लढवणार', असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मराठ्यांच्या एकीची भीती स्पष्ट दिसत आहे, इतर राज्यात एकाच टप्प्यात लोकसभा निवडणुका घेतल्या. महाराष्ट्रात मात्र पाच टप्प्यात निवडणुका होत आहेत. प्रत्येक ठिकाणी मोदी सभा घेत आहेत, याच्यातच आमचा विजय असल्याचंही जरांगे पाटील म्हणाले आहेत.

दरम्यान मनोज जरांगे पाटील आणि पंकजा मुंडे एकाच व्यासपीठावर आले होते. बीडच्या गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग येथे नारायण गडाच्या नारळी सप्ताहाच्या व्यासपीठावर मनोज जरांगे पाटील आणि पंकजा मुंडे एकाच व्यासपीठावर आले, यावेळी कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ उडला. शेवटी व्यासपीठावरील गोंधळ कमी करण्यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. यावेळी पंकजा मुंडे यांनी स्वतः हातामध्ये माईक घेऊन कार्यकर्त्यांना स्टेजवरून खाली जाण्यास सांगितले, तर पोलिसांनी स्टेजवर जमलेल्या गोंधळ घालणाऱ्या कार्यकर्त्यांना स्टेजवरून खाली पिटाळून लावले. अचानक व्यासपीठावर गर्दी वाढल्याने तारांबळ उडाली होती.

## गीतेंच्या विजयासाठी घटक पक्ष लागले कामाला

अनिल पाटील यांनी सांगितले.

महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या आधी विरोधात असणारा शिंदे आणि भाजपाचा एक गट मनापासून काम करणार का, हादेखील प्रश्न आहे. तटकरेंच्या प्रचारासाठी दिग्गज मैदानात उतरत असतानादेखील गीतेंच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, उध्दव ठाकरे, शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, आदित्य ठाकरे असे प्रमुख नेते मैदानात आहेत. त्यांच्यासोबत त्यांची फौज असल्याने प्रचारामध्ये त्यांच्याकडून मतदारांवर प्रभाव पाडण्यात त्यांना यश असल्याचे विविध प्रचारसभांमधून दिसून येते. गीतेंच्या प्रचारासाठी नेत्यांसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी रात्रीचा दिवस केला आहे. पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे ते गीतेंच्या प्रचारासाठी धावत आहेत. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात गीतेंसाठी दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे.

## पंडित पाटील यांच्या वाढदिवसाचा अभीष्टचिंतन सोहळा रद्द

शेकापच्या ज्येष्ठ नेत्या तथा पंडित पाटील यांच्या भगिनी माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे निधन झाले आहे. या पार्श्वभूमीवर यंदाचा अभीष्टचिंतन सोहळा रद्द करण्यात आल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे. तरी, दि. १ मे रोजी त्यांच्या निवासस्थानी कोणताही कार्यक्रम होणार नसल्याची नोंद कार्यकर्त्यांनी तसेच हितचिंतकांनी घ्यावी, असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

## मुरुडच्या पर्यटनावर परिणाम

असल्याचे स्पष्ट केले होते. ३० एप्रिलपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उष्णतेच्या मोठ्या लाटेचा परिणाम पर्यटनावर झाला असून, काशीद, मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटनावर झाल्याचे दिसून आहे. एरव्ही मोठ्या संख्येने असलेल्या पर्यटकांनी शनिवार-रविवार सुट्टी असूनही पाठ फिरवल्याचे दिसून आले. त्याचा फटका स्थानिक व्यावसायिकांना बसल्याचे काशीद येथील सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम यांनी सांगितले.

पर्यटनाच्या ऐन हंगामामध्ये वाढत्या तापमानामुळे, उन्हाच्या काहिलीने नागरिक, पर्यटक हैराण झाले असून, रविवारी सकाळपासून फारसे पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर दिसून आले नाहीत. मुरूडसारख्या किनारी भागात ३७ ते ४० सेल्सियसपर्यंत तापमान पारा जाणे यावरून दाहकता लक्षात येत असल्याची चर्चा मुरूड परिसरात ऐकायला मिळत आहे. तापमान वाढीमुळे रस्त्यावरून बाईक, सायकल किंवा चालत जातानादेखील त्रास होत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, वातानुकूलित निवास सुविधा असणाऱ्या रेस्ट हाऊसला पर्यटक प्राधान्य देत असल्याचे मनोहर बैले यांनी सांगितले. सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत नागरिकांनी किंवा पर्यटकांनी विनाकारण बाहेर जाणे टाळावे असे आवाहन शासनाच्या आरोग्य विभागाने केले आहे. समुद्रकिनारी वातावरणदेखील तप्त झाले असून, रस्त्यावरून चालणे अवघड झाले आहे. वाढत्या उन्हाच्या काहीलीमुळे ज्येष्ठ मंडळींनादेखील त्रास होत आहे. दुपारी महत्त्वाच्या बाजारपेठेत शुकशुकाट पाहावयास मिळत आहे.

## पोलादपुरात तापमान वाढीचा कहर

मिनिटांनी ढगाळ वातावरणामध्ये तापमान ४१ अंश सेल्सियसपर्यंत वाढले. यंदा एप्रिल महिन्यातच कमालीची तापमानवाढ होत असताना अजून मे आणि जून महिन्यांच्या मध्यापर्यंत पावसाला सुरूवात होईपर्यंत तापमानवाढीचा कहर पोलादपूरवासियांना सोसावा लागणार आहे.

पोलादपूर तालुक्यात मार्च महिन्याच्या शेवटी अवकाळी पाऊस तसेच एप्रिलच्या मध्यावर अवकाळी पाऊस झाला असून, सध्या तापमानवाढीचा कहर करण्यास सुरूवात केली आहे. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास ३२ अंशाची नोंद होत असताना सायंकाळी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास तब्बल ९ अंशाने पारा वाढून ४१ अंश तापमान झाल्याने बाजारपेठ आणि गजबजलेले रस्ते निर्मनुष्य होत असल्याचे दिसून आले. गुरांनी झाडाची सावली आणि पक्ष्यांनीही घरट्यांचा आश्रय घेतल्याने सृष्टीचक्र ठप्प झाल्याचे दिसून येत आहे. पोलादपूर शहरातील बँक ऑफ इंडिया परिसरातील मराठी व्यापारीवर्गाने ग्राहकांच्या डोक्यावरचे टळटळीत ऊन टाळण्यासाठी ग्रीन नेटसचे छत रस्त्याला घालून सावली निर्माण केली आहे.

सध्या तालुक्यात सकाळपासून अंगावर घामाच्या धारा आणि घशाला कोरड पडण्याचे प्रकार तापमानवाढीमुळे सर्वांनाच अनुभवण्यास मिळत आहेत. उन्हामुळे चक्कर आल्यासारखी अथवा डोळयांवर अंधार आल्यासारखी भावना अनेकांना शरीराचे तापमान संतुलीत राहिले नसल्याची जाणीव करून देत आहे.

## जांभुळवाडीत ‘जलजीवन’चे तीनतेरा

पायथ्याशी नाल्यावर विहीर बांधली गेली असून, वाडीपर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली आहे. मात्र, वाडीमध्ये घरोघरी पाणीपुरवठा करण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने वाडीमधील पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी नवीन विहिरीमधील पाणी वाडीमध्ये असलेल्या प्लास्टिक पाण्याच्या टाकीत आणून टाकले. मात्र, नळपाणी योजनेची विहिरीमध्ये बांधकाम करताना पडलेले सिमेंट, दगड, खडी यांची स्वच्छता न करता थेट विहिरीमधील पाणी पिण्यासाठी पाठवले जात आहे, असे आदिवासी बांधवांचे म्हणणे आहे. त्यामुळे स्थानिक आदिवासी ते दूषित पाणी पिण्यासाठी वापरत नाही. तरी, ती विहीर आधी सर्व पाणी बाहेर काढून स्वच्छ करावी आणि नंतरच पाणी वाडीमध्ये सोडावे, अशी मागणी ग्रामस्थ लक्ष्मण पारधी यांनी केली आहे. विहिरीमधील दूषित पाणी वाडीमध्ये पिण्यासाठी सोडले जात असल्याने ते पाणी प्यायल्याने काही ग्रामस्थांना अतिसारची लागण झाली होती. दूषित पाणी पिण्यासाठी पाठवले जात असल्याने शेवटी आदिवासी ग्रामस्थांवर पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. एका पिकअपमधून पाणी विकण्यासाठी आणले जाते. ते पाणी प्रति २०० लीटर बॅरलसाठी १०० रुपये आकारले जात आहेत. तर वाडीमध्ये लग्नकार्य असेल तर पाण्याचे टँकर आणावे लागतात. या वाडीमध्ये एका व्यक्तीकडे खासगी बोअरवेल आहे. मात्र, त्यांच्याकडे बोअरवेलचे पाणी कमी झाल्याने ग्रामस्थांना पाणी विकत घेण्याची वेळ आली. बोअरवेल असलेले ग्रामस्थ हे मार्च आणि एप्रिल महिन्यात सर्व ग्रामस्थांनी पिण्यासाठी प्रत्येकी दोन हांडे पाणी देत होते. मात्र, आता त्यांना पाणी पुरत नाही, त्यामुळे शासनाने आमच्या वाडीसाठी शासनाचा टँकर सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी वारे ग्रामपंचायतीकडे केली आहे. त्यासाठी जांभुळ वाडी ग्रामस्थांनी अर्ज दिला असून, त्या अर्जावर लक्ष्मण पारधी, दत्ता पारधी, बुधाजी केवारी, यशवंत केवारी, जयराम पिरकड, चंद्रकांत केवारी, पद्मा केवारी, धाई केवारी, भीमा पारधी, लहू पारधी आदींसह अन्य सर्व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## ८० किलो ड्रग्ससह १४ पाकिस्तानी अटकेत

क्रू मेंबर होते. त्यांच्याकडून ८६ किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले. या मालाची किंमत सुमारे ६०० कोटी रुपये आहे. मार्चमध्येही ऑपरेशन करण्यात आलेनार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने याआधीही गुजरात एटीएसच्या सहकार्याने १२ मार्च रोजी कारवाई केली होती. याबाबत माहिती देताना अधीक्षक सुनील जोशी यांनी सांगितले की, भारतीय तटरक्षक दल, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो आणि गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने अरबी समुद्रात आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेजवळ संयुक्त कारवाई केली. पोरबंदर किनाऱ्यापासून सुमारे १८० नॉटिकल मैल अंतरावर ड्रग्जची ६० पाकिटे घेऊन जाणारे जहाज जप्त करण्यात आले.

# गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी लसीकरण शिबीर



**। पेण । प्रतिनिधी ।**

कोनायसन्स स्कूल पेण, रोटरी क्बल ऑफ पनवेल, रोटरी क्लब ऑफ ठाणे व जिविका हेल्थ केअर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ आणि २५ एप्रिल रोजी हे लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या आयोजनामध्ये डॉ. सोनाली वनगे यांचा मोलाचा सहभाग आहे.

या लसीचे महत्त्व पटवून देताना डॉ. वनगे यांनी सांगितले की, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा स्त्रियांमधील सर्वात धोकादायक कर्करोग आहे. भारतात या आजारामुळे एका वर्षात सुमारे तीन लाख ते पाच लाख महिला आपला जीव गमावतात. हा एकच कर्करोग आहे ज्यासाठी प्रतिबंधक लस उपलब्ध आहे. कारण हा कर्करोग पॅपिलोमा विषाणू ‘एचपीव्ही’ संक्रमणामुळे होतो. या विषाणूच्या कुप्रभावापासून संरक्षण करण्यासाठी ही लस सर्वोत्तम आहे. ही लस खूप प्रभावी आहे. साधारणपणे या लसीचे दोन डोस सहा महिन्यांच्या अंतराने घ्यावे लागतात. ही लस अनेक वर्षांपासून बाजारात उपलब्ध आहे. परंतु, ती महाग असल्याने गरीब आर्थिक वर्गातील मुलींना परवडत नाही. मात्र, आम्ही ती विनामूल्य उपलब्ध करून दिली आहे. या लसीकरण मोहिमेमध्ये जि.प.च्या शाळा, शासकीय शाळा आणि आदिवासी पाड्यातील सर्व मुलींना लसीकरण करण्यात आले आहे. आजपर्यंत सुमारे २५०० डोस उपलब्ध आहेत. त्यापैकी १००० डोस दिले गेले आहेत. इतरही डोस द्यायचे आहेत. त्याबद्दल आम्ही लवकरच शिबीर लावणार आहोत. तरी, या शिबिराचा जास्तीत जास्त जणींनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सोनाली वनगे यांच्याकडून करण्यात आले आहे.

# मंगळवारी पुन्हा लोडशेडिंग

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मागील मंगळवारी लोडशेडिंग घेतल्यानंतर पुन्हा एकदा मुरुड महावितरणने येत्या मंगळवारी लोडशेडिंग करणार असल्याची घोषणा केली आहे. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भारनियमन करण्यात येणार आहे. याबाबत मुरुड महावितरणचे उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी सांगितले की, पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची सर्व कामे, त्याचप्रमाणे मुख्य वाहिनीवर येणाऱ्या वृक्षांची तोड करणे, झंपरची कामे पूर्ण करण्यासाठी सदरचे भारनियमन करण्यात येत आहे.

निवडक

## बसस्थानकात प्रवाशांचे हाल

**तळा :** तळा बसस्थानकात रविवारी बसच्या कमतरतेमुळे प्रवाशांचे हाल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. रोहा डेपोच्या दोन व माणगाव डेपोची एक बस लग्न सराईमुळे आरक्षित असल्याने तळा बसस्थानकात पाठविण्यात आल्या नाहीत. याचा फटका तळा बसस्थानकातील प्रवाशांना बसला असून बसस्थानकातुन सुटणाऱ्या रहाटाड, कासेखोल, इंदापूर, रहाटाडवाडी आदी बस रद्द करण्यात आल्या. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. यावेळी लग्न सराईच्या काळात जादा बसेसची व्यवस्था करण्याची मागणी प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

## दुचाकीची चोरी

**पनवेल :** खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ उभी केलेली मोटरसायकल चोरून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोप्रोली येथे राहणारे गणेश शिंदे यांनी आपली दुचाकी खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ उभी केली होती. कामावरून परतल्यानंतर त्यांना आपली दुचाकी जागेवर आढळून आली नाही. त्यांनी दुचाकीचा खांदेश्वर, मानसरोवर व पनवेल परिसरात शोध घेतला. मात्र, ती सापडून आली नाही. याप्रकरणी त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## राखीव बेडची मागणी

**पनवेल :** पनवेलमधील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपाजिल्हा रुणालय येथे विविध प्रकारच्या आरोग्य सुविधांचा लाभ नागरिकांकडून घेतला जातो. विविध दैनिक, साप्ताहिक, यु ट्यूब, पोर्टल यांचे संपादक व वार्ताहर, कॅमेरामन कार्यरत आहेत. त्यांच्या आरोग्याचा विषय लक्षात घेऊन पनवेलमधील पत्रकार बंधू-भगिनींसाठी ५ सुसज्ज बेड कायम राखीव ठेवण्याची तरतूद करुन पत्रकारांसाठी विनामूल्य रुग्णवाहिका देखील उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केवल महाडिक यांनी वैद्यकीय अधिकारी यांना केली आहे.

## अरुण जाधव यांचा सन्मान

**रसायनी :** आपले आदर्श मुंबई फाऊंडेशन व इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स सेवा संघाच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त आनंदीबाई म्हात्रे सभागृह विक्रोळी येथे नुकतेच महाराष्ट्रातील गुणवंतांचा व समाजसेवकांना 'एक्सलन्स स्टार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.संजय भोईर, भालचंद्र पाटे, अशोक भोईर, पूनम पाटगावे यांच्यातर्फे सामाजिक, साहित्य, शिक्षण, वैद्यकिय, उद्योग, कला, क्रीडा, सरपंच क्षेत्रात उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या आदर्शकांचा गौरव करण्यात आला.

## इंदिरा ठाकूर यांची सेवापूर्ती

**खरोशी :** रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षिका इंदिरा रविकांत ठाकूर यांनी आपल्या शिक्षक पेशाला पोलादपूर तालुक्यातील पैठण प्राथमिक शाळेत विद्याज्ञानाचे कार्य सुरू करून ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा सेवापूर्ती सोहळा साजरा करण्यात आला. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि प्रशासन यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवणे माणसे जोडणे विद्यार्थी घडवणे शैक्षणिक गुणवत्ता विद्यार्थ्यांना देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर करण्याचे काम ३५ वर्ष करून सेवानिवृत्त होत आहेत.

# संरक्षक भिंतीच्या प्रतिक्षेत 'मैदान'

## संबंधित बिल्डरवर कारवाईची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ ग्रामपंचायतीमधील छत्रपती शिवाजी महाराज मैदानाची भिंत तीन वर्षापूर्वी तोडण्यात आली होती. त्या भागात बांधकाम व्यवसायिकांनी इमारत बांधकाम साहित्य नेण्यासाठी मैदानाची भिंत तोडली होती आणि नंतर दुरुस्त करून देणार होते. मात्र, इमारत पूर्ण झाल्यानंतर देखील बिल्डरकडून मैदानाची भिंत बांधण्याची कार्यवाही केली जात नाही. दरम्यान, भिंत बांधून देण्याची लेखी हमी देणारे बिल्डर आता भिंत बांधणार नसतील तर त्या बिल्डरवर नेरळ ग्रामपंचायतीकडून बोजा टाकण्यात यावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केली आहे.**




छत्रपती शिवाजी महाराज मैदान हे नेरळ गावातील ग्रामपंचायतीच्या मालकीचे एकमेव मैदान आहे. मैदानाच्या बाजूला असलेला भूखंड एका बिल्डरने विकत घेतल्यावर त्या जमिनीवर इमारत बांधायची होती. मात्र, तेथे इमारत बांधण्यासाठी बांधकाम साहित्य नेण्यासाठी आणि ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्या बिल्डरने ग्रामपंचायतमधील काही सदस्यांना हाताशी धरून थेट छत्रपती शिवाजी महाराज मैदानाची भिंत तोडली आणि आपल्या जागेत जाण्यासाठी रस्ता तयार केला. मैदानाची भिंत तोडल्याने आणि मैदानात बांधकाम साहित्य ठेवले जाऊ लागल्याने त्याबाबत खेळाडू आणि कुंभार आळीमधील ग्रामस्थांनी आक्षेप घेतला. बांधकाम साहित्यांमुळे मैदानात खेळण्यासाठी येणार खेळाडूंना इजा पोहचत होती. स्थानिकांचा आक्षेप आणि नेरळ गावातील अनेकांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर शेवटी ग्रामपंचायतने संबंधित बिल्डरला नोटीस बजावली. त्यावेळी बिल्डरकडून आपले बांधकाम पूर्ण झाल्यावर संपूर्ण मैदान बांधकाम साहित्य मुक्त करण्याचे आणि संरक्षण भिंत पुन्हा बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. आता त्या बिल्डरची इमारत बांधून पूर्ण झाली आहे. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज मैदानाची भिंत काही बांधून पूर्ण झाली नाही. मैदानाची भिंत न बांधता बिल्डर आपले काम संपवून निघून गेला आहे. त्यामुळे बांधकाम साहित्य नेण्यासाठी तोडलेली भिंत कोण बांधून देणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आता एप्रिल मे महिना असून मैदानावर खेळण्यासाठी दररोज असंख्य खेळाडू येत असतात. मात्र, तुटलेल्या भिंतीमुळे आणि तेथील बांधकाम साहित्य तसेच पडून असल्याने खेळाडूंना दररोज किरकोळ जखमा होत आहेत. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीने पुढाकार घेवून मैदानाची तोडलेली भिंत पुन्हा बांधून घ्यावी यासाठी संबंधित बिल्डरच्या नावाने नोटीस काढावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. दुसरीकडे नेरळ शिवसेना ठाकरे गटाने त्या भिंतीचे बांधकाम बिल्डर करून देणार नसेल तर ग्रामपंचायतने आपल्या मिळकतीचे आर्थिक नुकसान केल्याबद्दल संबंधित बिल्डरवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.



## सतीश तुपे सेवानिवृत्त

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता खात्यातील इलेक्ट्रिक सेक्शनचे चार्जमन, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे मॅनेजिंग कमिटी मेंबर सतीश शंकर तुपे हे मुंबई पोर्ट ट्रस्टमधून ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मंगळवारी (दि.३०) पासून सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त माझगाव येथील वर्कशॉपमध्ये सतीश तुपे व पत्नी श्रद्धा तुपे यांचा शुक्रवारी (दि.२६) जाहीर सत्कार केला. त्याचप्रमाणे मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियन, विविध खात्यातील कामगार, नातेवाईक, माझगाव डॉक, फ्लोटीला वर्कशॉप यांच्यावतीने सतीश तुपे यांचा सत्कार करण्यात आला.

सतीश तुपे यांनी कामगारांचे दैनंदिन प्रश्न, हॉस्पिटलला मदत, पेन्शन असे अनेक प्रश्न पाठपुरावा करून यशस्वीपणे सोडविले. त्यांना उदंड आयुष्य आणि चांगले आरोग्य लाभो, तसेच त्यांच्याकडून यापुढेही कामगारांची चांगली सेवा घडो. अशी शुभेच्छापर भाषणे सुधाकर अपराज, विद्याधर राणे, दत्ता खेसे, विजय रणदिवे, विकास नलावडे, निसार युनूस, मारुती विश्वासराव, विजय पंदीरकर, आप्पा सूर्यवंशी, राजेश वाधवाणी, इकबाल बामणे, दत्तात्रेय सुगवेकर, संध्या सुगवेकर, स्मिता चंदने आदी मान्यवरांनी केली.

## चिखलप केंद्राचा अभ्यास दौरा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा तालुक्यातील चिखलप केंद्रातील सर्व शाळांतील शिक्षकांनी केंद्र प्रमुख किशोर मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत अगदी दुर्गम भागातील तालुक्यात प्रथम क्रमांक आलेल्या रायगड जिल्हा परिषद गायरोणे शाळेला बुधवारी (दि.२४) भेट दिली.



यावेळी मुख्याध्यापक सुनील साठे व स्मिता शिंदे यांनी परसबागेतील विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे यांची माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेले विविध उपक्रम यामध्ये शाळापुर्व तयारी मेळावा, शाळा आणि वर्ग सजावट, शालेय रंगरंगोटी, वृक्षारोपण आणि जोपासना, तंबाखू मुक्त शाळा, परसबाग जिल्हा आणि तालुकास्तरीय बक्षीस, मेरी माटी मेरा देश, विद्यार्थी बचत बँक, नवोदय परीक्षा विद्यार्थी निवड, शिष्यवृत्ती धारक आणि पात्र विद्यार्थी घडविणारी दुर्गम शाळा, प्लास्टिक मुक्त शाळा, कब बुलबुल उपक्रम राबविणारी शाळा, क्रीडा स्पर्धा आयोजन आणि सहभाग, आरोग्य तपासणी, महावाचन चळवळ सहभाग, सहल आणि क्षेत्रभेट, तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी घडविणारी शाळा, आदर्श आणि गुणवंत शिक्षकवृंद बँक, बाल वाचनालय विविध स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी अध्यापन तसेच इतर उपक्रमांची माहिती दिली.

एकदम दुर्गम समजल्या जाणाऱ्या गायरोण शाळेतील विद्यार्थी अत्यंत गुणी व हुशार आहेत. नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्ती धारक झाले असून मंथन स्पर्धा परीक्षामध्ये जिल्हा व विभाग स्तरावर क्रमांक पटकावला आहे. तसेच, स्वच्छता, टापटिपपणा, ग्रामस्थांचे सहकार्य व शिक्षकांच्या योगदानामुळे शाळा नावारूपाला आली असून चालू वर्षी शासनामार्फत राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत तालुका पातळीवर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

## अपघातात तरुणाचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

झुबेद सुर्वे व फुजैल मोहम्मद शोएब खान हे दोघे मोटरसायकल (एमएच-४६-एए-४७१०) घेऊन अलिबाग येथे जात असताना विसावा हॉटेलच्या समोर रस्त्याच्या बाजूला असलेल्या खडीवरून घसरून पडले. यात फुजेलच्या डोक्याला जबर मार लागून त्याचा मृत्यू झाला. यावेळी झुबेद हा भरधाव वेगाने मोटरसायकल चालवत घेऊन जात असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. मोटरसायकल भरधाव वेगाने चालवून अपघाताला कारणीभूत झाल्या प्रकरणी झुबेदच्या विरोधात दि.२४ एप्रिल रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



## कुर्डूस येथे नेत्रतपासणी शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब पोयनाड आणि ज्येष्ठ नागरिक संस्था कुर्डूस विभागाच्या संयुक्त विद्यमाने व लायन्स हेल्प फाउंडेशन चोंढी यांच्या सहकार्याने गुरूवारी (दि.२५) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५ मोतीबिंदू रुग्ण आढळले असून त्यांच्यावर लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या चोंढी येथील डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

यावेळी लायन्स क्लब पोयनाडचे विकास पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात लायन्स क्लब पोयनाडच्या विविध उपक्रमांबाबत आणि प्रामुख्याने नेत्र शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य नेत्र रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिये संदर्भात माहिती दिली. २०२३-२४ या वर्षात आतापर्यंत १७९ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून सामान्य नेत्ररुग्णांना नवी दृष्टी देण्याचे कार्य व त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या खर्चात बचत करण्याचे काम ही सामाजिक संस्था करीत असल्याचे प्रतिपादनही पाटील यांनी केले.

शिबिर यशस्वी करण्याकरता यशवंत पाटील, सुभाष पाटील, अशोक पाटील, जनार्दन पाटील, वनिता पिंगळे, नंदा पिंगळे, बबन पिंगळे, सखाराम पाटील, चंद्रकांत म्हात्रे, बांधणकर, प्रदीप सिनकर, प्रमोद पाटील, विकास पाटील या सर्वांच्या प्रयत्न केले.

## मुरुडमधील फरार आरोपींना अटक

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड पोलीस ठाण्यात काही वर्षांपूर्वी एका चोरीच्या गुन्ह्यात अडकलेले दोन आरोपी जामिनावर सुटले होते. परंतु, कोणत्याही कोर्ट केसला हजर न राहिल्याने अखेर न्यायालयाने त्यांना अटक वॉरंटचा आदेश काढला होता. त्याप्रमाणे मुरुड पोलिसांनी या दोन आरोपींना शोधून न्यायालयापुढे हजर करण्याची जबाबदारी वाढली होती.

आरोपी माणिक तानाजी सावंत (५३), नशिर नबीलाल सय्यद (४०) हे दोन्ही आरोपी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दिवड येथील राहणारे होते. २००५ पासून हे आरोपी मिळत नव्हते. यांचा मुरुड पोलीस कसून शोध घेत होते. पोलिसांना खात्रीशीर बातमी मिळाल्यावर मुरुड पोलिसांनी त्यांना पकडण्यासाठी सापळा रचला. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप पडवळ, पोलीस हवालदार खेळू शीद, पोलीस नाईक गणेश डोंगरे यांनी आरोपींच्या परिसरात जाऊन अखेर त्यांना अटक करून आणले आहे.

## रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

**। रसायनी । वार्ताहर ।**



दांड-रसायनी रस्त्यावरील चांभार्लीचा उतार हा जीवघेणा असून या रस्त्यावरून प्रवास करताना अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे. या रस्त्याच्या उतारा लगत दुकाने व कार्यालये आहेत. येथे नागरिकांची नेहमी रहदारी असते. शिवाय रस्त्यालगत शिवनगर वसाहत, एमआयडीसी वसाहत, जय प्रेसिजन कंपनी, एनआयएसएम सेबी प्रकल्प, शिशुविकास बालमंदिर, जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, प्रिआ स्कूल आदी असल्याने चांभार्ली उताराचा रस्ता ओलांडत असताना जीव मुठीत घेऊन नागरिक रस्ता ओलांडत आहेत.

या अगोदर रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या वाहनांना लगाम बसावा म्हणून उताराजवळील आगरी कट्ट्यासमोर, सेबी वलणाजवळ गतिरोधक बसविण्यात आले होते. परंतु, एनआयएसएम सेबी प्रकल्पाच्या उद्घाटनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्याने या रस्त्यावरील गतिरोधक काढण्यात आले होते. गतिरोधक काढून तीन वर्ष होऊनही या उताराच्या रस्त्याला गतिरोधकच नसल्याने अपघातांची मालिका सुरू आहे. काळणवाडी, शिवनगर, तळेगाव, पानशिल आदी गावांतील विद्यार्थ्यांना हा रस्ता ओलांडून शिक्षणासाठी जावे लागते. अशावेळी अनर्थ घडल्यास जिम्मेदार कोण, असा सवाल नागरिक करीत आहेत. यासाठी चांभार्ली मोहोपाडा रस्त्याला गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

## शिवाजी राणे यांचे निधन

**अलिबाग :** तालुक्यातील परहूरपाडा येथील शिवाजी बाबाजी राणे (८१) यांचे वृध्दापकाळाने शनिवारी (दि.२७) निधन झाले. ते



शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. तसेच, को.ए.सो कै.ध.श.खोपकर माध्यमीकशाळेचे सदस्य होते. त्यांच्या पार्थिवावर परहूरपाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार (दि.६) मे रोजी होणार आहेत.

## आदेश खेडकर जिल्ह्यात प्रथम

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण येथील सुमतीबाई देव प्राथमिक विद्यालयातील इयत्ता पाचवीमध्ये शिकणारा विद्यार्थी आदेश अंबादास खेडकर याने मंथन परीक्षेत रायगड जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तसेच, कोकण विभागात दुसरा तर राज्याच्या गुणवत्ता यादीमध्ये सहावा आला आहे.



आदेशने इतरही स्पर्धा परीक्षांमध्ये सुयश संपादन केले असून त्यामध्ये गणित संबोध परीक्षा व गणित प्राविण्य परीक्षेत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, जवाहर नवोदय परीक्षेत सुद्धा आदेशची निवड झाली आहे. आदेशचे आई वडील प्राथमिक शिक्षक असून आदेशच्या या यशामागे त्याचे आई-वडील व शिक्षकांचा महत्वाचा वाटा आहे. तर, पडळकर व रत्नाकर पाटील या शिक्षकांनी देखील आदेशसाठी खूप मोठी मेहनत घेतली आहे. या यशाबद्दल आदेशचे पेण पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे, केंद्रप्रमुख रामकृष्ण भोईर व शाळेचे संचालक मंडळ यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.
- कुकूचकू पोल्ट्री फार्म निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्ले च्या पीक अप गाडीवर ड्रायवर पाहिजे पगार सर्व साधारण रूपये २५,००० प्रती महिना मिळेल कुटूंबासहित राहण्याची सोय आहे. संपर्क : अनुष्का राऊत ७७९८८८३८६४
- क्षितीज बंगला, विद्यानगर (तांत्रिक विद्यालयामागे) 1BHK भाड्याने देणे आहे. (गाडी पार्किंग उपलब्ध) ९९६९८२८२३९/९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# खवय्यांना करवंद, कैऱ्यांची मेजवानी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

**बहुविध वृक्षराजीने समृद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यातील रानावनात करवंदाच्या जाळीत हिरवी टिपूर करवंद लगडली आहेत. शिवाय रानातील व आंबा बागेतील विविध प्रकारच्या आंब्यांना कैऱ्या लागल्या आहेत. त्यामुळे आंबट करवंद व कैऱ्यांवर खवय्ये तुटून पडत आहेत. त्यांना जणूकाही मेजवानी मिळत आहे.**

## आदिवासी महिलांना चांगला रोजगार

> कच्ची करवंद व कैऱ्या बाजारात मिळू लागल्या आहेत. बच्चेकंपनी व मोठे देखील आवर्जून या रानमेव्याचा आनंद घेतात. जिल्ह्यात हे विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.
> \- दामोदर हुले पोटलज

सुधागड तालुक्यात कच्ची करवंद बाजारात येऊ लागली आहेत. आणि आता इतरही तालुक्यात करवंद विक्रीसाठी येत आहेत. आदिवासी महिला रानातून ही हिरवी कच्ची करवंद गोळा करून टोपलीत घेऊन तालुक्याच्या बाजारात विक्रीसाठी आणत आहेत. साधारण १० रुपयांना एक वाटा मिळतो. आदिवासी महिलांना यातून चांगला रोजगार मिळत आहे.

याशिवाय रानातील व बागेतील विविध प्रकारच्या आंब्याच्या झाडांना कैऱ्या लगडल्या आहेत. या कैऱ्यादेखील





बाजारात विक्रीसाठी येत आहेत. १५ ते २० रुपयांना ५ छोट्या कैऱ्यांचा वाटा मिळत आहे. याशिवाय काही दिवसांनी पिकलेली करवंद, तोरणं, भोकर, रांजण, चिकण्या, काजू आदी रानमेवा दाखल होईल.

### आंबट कैऱ्यांची लज्जत

*स्थानिक कैऱ्या सुक्या व ओल्या मासळीचे कालवण, वरण आदींमध्ये टाकल्या जातात. त्यामुळे जेवणाला वेगळीच लज्जत येते. याशिवाय फोडी करून हळद, मसाला व मीठ टाकून खाल्ल्या जातात किंवा लोणचं देखील केले जाते. सुकवून आंबोशी केली जाते. तसेच, पन्हं देखील केले जाते.*

### कच्ची करवंद

*कच्ची करवंदाची चटणी केली जाते. मीठ, तिखट, कोथिंबीर व मिरची टाकून ही लज्जतदार चटणी केली जाते. शिवाय मीठ टाकून नुसती खाल्ली देखील जातात. काही जण मिठाच्या किंवा साखरेच्या पाण्यात टाकून खातात. तर, लोणचं देखील बनवले जाते.*

# माथेरानमध्ये स्थानिकांचे पाणीकपात

## हॉटेल व्यावसायिक यांना मुबलक पाणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये मे महिन्यात हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. पर्यटकांच्या सुविधेसाठी सध्या माथेरान शहरात नागरी वस्तीत पाणी कपात सुरु आहे. मात्र, शहरात एका बाजूला पाणी कपात आणि दुसऱ्या बाजूला हॉटेल व्यवसायिकांना मुबलक पाणी पुरवठा होत आसल्याचे बोलले जात आहे. मात्र, असा दुजाभाव केला जात असा आरोप सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी केला आहे.

अतिथी देवोभव या उक्तीप्रमाणे प्रथम प्राधान्य पर्यटकांसाठी माथेरानमधील हॉटेल्समध्ये मुबलक पाणी पुरवठा केला जातो. त्यात स्थानिक शहरवासीयांना पावसाळ्यात चार महिने मुबलक पाणी मिळत असते. त्यानंतर डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत शारलोट जवळील नैसर्गिक पाण्याचे झरे वाहत असतात. त्यामुळे शारलोट लेक या तलावाची पाण्याची पातळी डिसेंबरपर्यंत पाण्याचा साठा असतो. या पूर्वी माथेरानमध्ये दर दिवशी ८ ते १० लाख लिटर पाणी लागत होते. परंतु, माथेरान काही स्थानिक नागरिकांनी आपल्या रहात्या घराचे लॉजिंगमध्ये रूपांतर केले आहे. त्यामुळे सुट्टीच्या ठराविक दिवसात दर दिवशी १५ लाख लिटर पाण्याची गरज लागते. त्यामुळे पर्यटक देखील येण्याचे प्रमाण वाढले आहे.

माथेरानमधील ५० टक्के सर्व सामान्य कुटुंबाला दर दिवशी ५०० लिटर पाणी मिळाले तरी खूप झाले. परंतु, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शाखेचे अभियंते भोसले यांच्या कारकिर्दीत हॉटेल व लॉजिंग व्यसायीकांना मागणी तसा पुरवठा करण्यासाठी माथेरानमधील दोन विभाग करुन आठवड्यातून सोमवार व मंगळवार पाणी पुरवठ्यात कपात करण्यात येऊन ते पाणी इतरत्र वळविण्यात येते असल्याचा आरोप पार्टे यांनी केला आहे. पाणी पुरवठा नियोजन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून केले जाते. त्यासाठी कनिष्ठ अभियंता या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र मागील दहा वर्षात या पदावर असलेला अधिकारी किती दिवस आला आहे असा प्रश्न पार्टे यांनी केला.

दर दिवशी संपूर्ण गावात १५ लाख लिटर मुबलक पाणी लागते. त्यासाठी शहरातील तर नेरळ येथून फक्त दोन ते तीन महिने पाणी पंपिंग करावे लागेल. परंतु, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नेरळ कुंभे ते जुम्मा पट्टी, ते वाटर पाईप, ते माथेरान असे एकूण तीन टप्प्यात पाणी पंपिग करुन पाणी पुरवठा करतात. त्यासाठी येणारे वीज बिल खूप जास्त येते त्यामुळे सर्व नळ कनेक्शनधारकांकडून आवाच्या सव्वा वाढीव पाण्याची बील आकारून त्याची वसुली केली जाते. असे असताना देखील माथेरानमधील स्थानिक रहिवाशी हे पिण्याच्या पाण्याचे बील हे कायम वाढीव येत आहे. मात्र, माथेरान शहरातील नागरी वस्तीत दर सोमवारी आणि मंगळवारी पाणी कपात करताना पाणी पुरवठा केला जात नाही. त्यावेळी माथेरान शहरातील हॉटेल लाईन भागात कोणत्याही प्रकारची पाणी कपात नाही याबद्दल सर्व सामान्य यांच्या साठी दुजाभाव का? असा प्रश्न देखील जनार्दन पार्टे यांनी उपस्थित केला आहे.

# नागेवाडीमध्ये पोहोचले पाणी

## आदिवासी ग्रामस्थांची गैरसोय टळली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भेडसावत आहे. त्यात पाथरज ग्रामपंचायतमधील नागेवाडीमधील पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. वाडीमधील आदिवासी लोक आणि महिलांना काही किलोमीटर अंतर पायी जाऊन पाणी आणावे लागत होते. मात्र, त्या भागातील आदिवासी लोकांसाठी बोअरवेल खोदून दिली आणि त्यानंतर आता त्या बोअरवेलमधील पाणी विहिरीमध्ये टाकण्यात आले.

दरम्यान, गावाजवळ पाणी आल्याने आदिवासी महिलांची पाण्यासाठी पायपीट थांबली आहे.



नागेवाडीमधील ६०० लोकवस्तीच्या आदिवासी वाडीमध्ये असलेल्या पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणाऱ्या दोन्ही विहिरी आटल्या आहेत. त्यामुळे येथील आदिवासी महिलांना डोक्यावर हांडे घेऊन रणरणत्या उन्हात डोंगरपाडा येथील पुलावर यावे लागत होते.

त्याबाबत समाज माध्यम आणि वृत्तपत्रांनी दखल घेतल्यावर कशेळे गावातून सामाजिक कार्यकर्ते भास्कर दिसले यांनी नागेवाडीमध्ये बोअरवेल खोदणारी गाडी नेली.

ग्रामस्थांचे सल्ल्याने बोअरवेल खोदली असता ४५० फुटावर भरपूर पाणी लागले.त्यामुळे या वाडीमधील आदिवासी लोकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर झाली.

# 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे विशेष ऑफर

**। पुणे । प्रतिनिधी ।**

समृद्ध परंपरा असलेल्या व ग्राहकांप्रति विश्वासार्ह असलेल्या प्रतिष्ठित ज्वेलरी ब्रँड पीएनजी ज्वेलर्सतर्फे उत्सवकाळानिमित्त 'सप्तम कलेक्शन'मधील नवीन डिझाईन्स सादर करण्यात आल्या आहेत. वर्षानुवर्षे दागिन्यांमधील उत्कृष्टतेच्या वारशासह पीएनजी ज्वेलर्सने कलाकुसर व अभिनवता याबाबत आपली कटिबद्धता कायम ठेवत सणासुदीच्या काळासाठी दागिन्यांची विस्तृत श्रेणी सादर केली आहे. सप्तमकलेक्शनने सुरुवातीपासूनच ग्राहकांची पसंती मिळवली आहे. या कलेक्शनमधील उत्कृष्ट कलाकुसर व कालातीत डिझाईन्सचे ग्राहकांनी कौतुक केले आहे.

दिवाळी २०२३ यामध्ये मिळालेल्या यशानंतर उत्सवकाळानिमित्त पुन्हा एकदा 'पीएनजी ज्वेलर्स'ला सप्तम कलेक्शनमधील नवीन दागिन्यांची श्रेणी सादर करताना आनंद होत आहे. या कलेक्शनमध्ये कुंदन, जडाऊ, हिरे व पारंपरिक सोन्यामध्ये तयार करण्यात आलेले हार, कानातले, अंगठी, ब्रेसलेट इत्यादी उत्कृष्ट दागिन्यांची विस्तृत श्रेणी पाहायला मिळणार आहे. नवीन सप्तम कलेक्शन विषयी माहिती देताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की, नवीन 'सप्तम कलेक्शन' हे एकता, प्रेम, उत्सवाची भावना, समृद्धी, नवी सुरुवात, उत्साह व सौंदर्यतेचे प्रतिबिंब आहे, जे या मूळ संकल्पनेवर आधारित आहे. यंदाच्या उत्सवकाळासाठी आमच्या ग्राहकांना त्यांची आवडती शैली व पसंतीनुसार दागिने खरेदीचा अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहोत. हे कलेक्शन पीएनजी ज्वेलर्सच्या भारतभरातील सर्व दालनांमध्ये १५ मे २०२४ पर्यंत उपलब्ध असेल. या उपक्रमाचा एक भाग म्हणून पीएनजी ज्वेलर्सतर्फे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत, व हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट ५० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच जुन्या सोन्याच्या दागिन्यांच्या एक्सचेंज वर शून्य टक्के घट मिळणार आहे. या ऑफर्सद्वारे ग्राहकांना योग्य दरात उत्कृष्ट दागिने खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

# सापाला दिले जीवदान

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड शहरातील फातीमा कुलसुम बेगम हॉस्पीटल येथील मागच्या बाजुस गटारातुन दोन साप बाहेर येत असल्याने हॉस्पीटलच्या कर्मचाऱ्यांनी ताबडतोब सर्पमित्र संदिप घरत यांना बोलवण्यात आले.



त्वरीत सर्पमित्र येऊन पाहणी केली असता धामण असल्याचे निदर्शनास आले. सर्पमित्रांनी धामणीला पकडण्यात यश आले. सर्पमित्र संदिप घरत यांनी सांगितले की धामण साप असुन दोन्ही नर असुन हे दोघे जण गटारातुन बाहेर येऊन मारामारी करत असताना येथील कर्मचाऱ्यांना दिसलं. जसं माणसांमध्ये मारामारी होत असते तसं प्राणी मध्ये मारामारी होत असतात. तरी नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही. अशी प्रतिक्रिया सर्पमित्र संदिप घरत यांनी दिली.

# घोटावडे, कासारवाडीला स्वप्नातील गावाचा दर्जा

**। पाली । वार्ताहर ।**

रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाउंडेशनच्या वतीने सुधागड तालुक्यातील घोटावडे कासारवाडी हे गाव सलग दुसऱ्या वर्षी स्वप्नातील गाव म्हणून शुक्रवारी (दि.२६) घोषित करण्यात आले. घोटावडे कासारवाडी येथे गाव विकास समिती आणि ग्रामस्थ यांनी एकत्रित येऊन गाव विकास करण्याच्या व आदर्श गाव करण्याच्या हेतूने २०१९ पासून प्रयत्न सुरू केले. पूर्वीची गावाची परिस्थिती खूप दैनिय होती, परंतु, स्वदेस फाऊंडेशन मार्फत झालेली पाणी योजना, शौचालय, शाळेसाठी शौचालय, शाळेसाठी सोलर लाईट, ग्रंथालय, सोलर पथदिवे, मुलांसाठी संगणक, प्राथमिक उपचार पेटी, तसेच वेगवेगळ्या उत्पन्न वाढीच्या योजना राबविण्यात आल्या. जास्तीत जास्त



शेतकऱ्यांनी शेतात फळबाग लागवड, ठिबक सिंचनच्या माध्यमातून चारा लागवड केली आहे व शेळीपालन, कुकुटपालन, कौशल्य प्रशिक्षणातून गवंडी, महिला बचत गट आज समुदायात सक्षम पणे तयार होऊन कार्यान्वित पणे काम करत आहेत.

स्वप्नातील गाव घडविण्यासाठी गाव विकास समितीचे सर्व सदस्य, बचत गटांमधील महिला,युवक व ग्रामस्थ आणि स्वदेस फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक प्रदीप साठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वदेस टीम यांनी अहोरात्र मेहनत घेऊन हे गाव स्वप्नातील गाव म्हणून प्रमाणित केले.

या कार्यक्रमासाठी जसदिप लोने, आनंद मांधने, वैष्णवी भालेकर, तुषार इनामदार, शिवदास वायाळ, श्रीधर कोकरे, मुग्धा सोनावणे, सृष्टी ठाकूर, शबनम बुशरा ,जितेंद्र म्हात्रे, प्रवीण पाटील, विनोद पाटील उपस्थित होते.

# लग्न सराईमुळे बांबूच्या वस्तूंना मागणी

## आदिवासी बांधवांना मिळाला रोजगार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

सध्या लग्न सराई सुरु असून शुभ कार्यासाठी बांबूच्या वस्तू आवश्यक असतात. त्यात टोपल्या, सुपांना विशेष मागणी असते आणि या बांबूच्या पातीपासून या वस्तू बनविणारे आदिवासी लोकांना चांगला रोजगार मिळत आहे. नेरळ येथील बाजारात या वस्तू आदिवासी लोक विक्रीसाठी घेऊन येत असतात आणि त्यामुळे लग्न कार्यासाठी खरेदी करणाऱ्यांची मोठी गर्दी दिसून येते. पोशीर, कळंब आणि वारे या ग्रामपंचायत मधील आदिवासी वाड्यांम धील लोक वर्षानुवर्षे आणि बारमाही व्यवसाय म्हणून बांबूच्या पातींपासून वस्तू निर्माण करतात.

हिंदू धर्मात कोणत्याही धार्मिक कार्यासाठी आवश्यक असलेल्या बांबूच्या वस्तू यांना सध्या लग्नसराईमध्ये मागणी वाढली आहे. या वस्तू मिळण्याचे हक्काचे ठिकाण म्हणून नेरळ ओळखली जाते आणि येथील बाजारात बांबूच्या पातींपासून बनवलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी ठाण्यापासून लोक येत असतात. बांबूच्या पातींपासून बनविल्या जाणाऱ्या टोपल्या, लहान टोपल्या तसेच सूप आणि खेळण्यातील वस्तू बनविल्या जातात. त्यात हिंदू धर्मातील कोणत्याही कार्यासाठी बांबूच्या पातींपासून बनवलेल्या टोपल्या आणि सूप आवश्यक बाब असते. त्यामुळे या वस्तू बनविणाऱ्या आदिवासी लोकांच्या वस्तूंना लग्नसराईच्या काळात मोठी मागणी असते.टोपली आणि सुपांची निर्मिती तालुक्यातील आदिवासी लोक करीत असतात. पोशीर ग्रामपंचायतीमधील गिऱ्याचीवाडी, उंबरवाडी, चिंचवाडीमधील बहुसंख्य आदिवासी ग्रामस्थ हे बांबूच्या वस्तूंची निर्मिती करीत असतात. तिन्ही वाड्यांतील प्रत्येक घरात बांबूच्या वस्तू बनविण्याचे काम वर्षभर सुरु असते.त्यासाठी जंगली भागातील बांबू विकत आणून आपली कारागिरी सुरु करतात.

पोशीर ग्रामपंचायत मधील तीन आदिवासी वाड्यांसह कळंब ग्रामपंचायत मधील भागूचीवाडी आणि वारे ग्रामपंचायतीमधील जांभूळवाडी येथील काही आदिवासी कुटुंब देखील या व्यवसायात असून गौरी गणेशोत्सव काळात त्या वस्तूंना अधिक मागणी असते.




सणांच्या माध्यमातून आदिवासी लोकांना टोपली आणि सुपे यांच्या विक्रीतून आर्थिक स्थिरता मिळत असते. त्यामुळे बाजारात देखील या वस्तू काही ठराविक ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती असल्याने गिऱ्हाईक देखील त्या ठिकाणी वस्तूंची खरेदी करण्यासाठी येत असतात. तर आदिवासी भागातील लोक दरवर्षी आणि गेली अनेक वर्षे नेरळ येथे स्टेशन समोर व्यवसाय करतो. पूर्वी त्या ठिकाणी सकाळी सात वाजता जरी बांबूच्या वस्तू घेऊन आलो तर दोन तासात त्यांची विक्री होत असते अशी माहिती कारागीर नामी नागो पारधी यांनी दिली आहे.

# गुरुवर्य सुभानराव राणे यांची ४२ वी पुण्यतिथी साजरी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

थोर संतश्रेष्ठ सद्गुरू श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या अवधूत सांप्रदायाचा रायगड जिल्ह्यात प्रचार आणि प्रसार करणारे गुरुवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांची ४२ वी पुण्यतिथी अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे शनिवारी संपन्न झाली. सकाळी श्रींची पूजा व अभिषेक, दत्तात्रेय सहस्त्रनामावली, प्रेमध्वजारोहण असे कार्यक्रम संपन्न झाले. या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त पेझारी येथील राजाराम पाटील, शशिकांत पाटील, वाघोडे येथील डॉ. रवींद्र राऊत यांचा विशेष सन्मान ज्येष्ठ पंतभक्त शंकरराव म्हात्रे व गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर राणे यांच्या उपस्तिथीत करण्यात आला. यावेळी विविध पंतभक्तांनी भजनसेवा सादर केली. भजनरत्न महादेवबुवा शहाबाजकार यांची दरवर्षीप्रमाणे भजनसेवा संपन्न झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध पंतभक्त या कार्यक्रमास उपस्थित होते.



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या बंगला/मालमत्ताचे हक्क सौ. मीनाक्षी गिरीधर उचिल यांच्याकडून भेटवस्तूद्वारे तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याचा/संपत्ती मिळवण्याचा मानस आहे. तरी सदर बंगला/मालमत्ता मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर बंगला/मालमत्ताचे वर्णन खालीलप्रमाणे :-

बंगला क्र. ७ब अंतर्गत लेआउट प्लॉट क्रमांक A-१५(२) वर उभा असलेला गट क्रमांक १८/A/७३ मधील सूर्यवन कॉम्प्लेक्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रस्तावित सोसायटीमधील, येथे स्थित आहे गट क्रमांक १८/२, ३, ४, ५, १९/०, २१/०, २२/२ आणि १५/० आणि उप-गट क्रमांक असे विविध उप-भूखंडांमध्ये विभागलेले १८/A/१ ते १८/A/८०, गाव खानवळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र ४१०२२१.

बंगला क्रमांक ७B चे जमिनीचे क्षेत्रफळ आणि बांधलेले-संरचनेचे क्षेत्रफळ (बाल्कनी, टेरेस, फ्लॉवर बेड इ. समावेश) खालीलप्रमाणे आहे:-

| अनुक्रमांक | विशेष | क्षेत्र तपशील |
|---|---|---|
| १ | एकूण भूखंड क्षेत्र | २१४२.८५१ चौ. फूट. |
| २ | बंगल्याचे क्षेत्रफळ-तळमजला | ४६६.७१० चौ. फूट. |
| ३ | बंगल्याचे क्षेत्रफळ- पहिला मजला | ५०६.५९५ चौ. फूट. |
| ४ | निव्वळ भूखंड क्षेत्र (१-२) | १६७६.१४१ चौ. फूट. |
| ५ | बांधकाम वर्ष | १९९३ |

सदर वर नमूद सदनिकांचे हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या सदनिकांवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २९/०४/२०२४

सही/-
**पॉल लीगल असोसिएट**
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला, ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३, स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ, पनवेल, रायगड, ४१०२०६
ई-मेल: info@paullegalassociates.com

# सिटीस्कॅनमुळे रुग्णांना मिळणार जीवदान

## माणगावात सिटीस्कॅनची प्रतीक्षा संपली

**। माणगाव । वार्ताहर ।**

दक्षिण रायगडमधील तसेच महामार्गावरील अपघातग्रस्त व इतर रुग्णांना तातडीचे उपचार मिळावेत यासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीनची अत्यंत गरज होती. सिटीस्कॅन मशीन एका खाजगी कंपनीमार्फत शासनांनी बसवली असून ती अवघ्या तीस दिवसात अपघातग्रस्त व गंभीर आजाराच्या रुग्णावर निदान करण्यासाठी ती सज्ज होणार आहे. या सिटीस्कॅनमुळे रुग्णावर निदान करून योग्य उपचार होणार असल्याने अशा रुग्णांना जीवदान मिळणार आहे. या सिटीस्कॅन मशीन बसविण्याचे काम पूर्ण झाले असून ती लवकरच नागरिकांच्या सेवेला उपलब्ध होणार असल्याने रुग्ण व नागरिकांना दिलासा मिळणार आहे.




माणगाव उपजिल्हा रूग्णालयातील सिटीस्कॅन मशीन तब्बल सात वर्षापासून बंदच होती. या मशिनच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून अनेक वेळा तांत्रिक उपचार करण्यात आले. मात्र, हे कोमात गेलेले सिटीस्कॅन मशीन सात वर्षानंतरही शुद्धीवर आलेच नाही. अखेर सिटीस्कॅन मशीनचे संबंधित तंत्रज्ञ बोलावून मशीनची पाहणी केली असता हे सिटीस्कॅन मशीन डेथ असल्याने ते भंगारात (निर्लेखन) करण्यात यावे असा माणगाव उपजिल्हा रुग्णालयाला दाखला दिला होता. त्यानंतर शासनांनी रूग्णालयात नवीन सिटीस्कॅन मशीन एका खासगी कंपनीमार्फत बसविण्यासाठी परवानगी दिली. सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर बसविले असून उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना मोफत तर खाजगी रूग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना बाजारातील महागडे सिटीस्कॅन न करता ते अत्यल्प दरात केले जाणार आहे. ते मशीन कांही दिवसात रुग्णांच्या सेवेला उपलब्ध होणार आहे. तर या मशीनसाठी स्वंतत्र वातानुकूलित खास कक्ष करण्यात आला आहे. त्यामुळे माणगावकरांची सिटीस्कॅनची प्रतीक्षा आता संपणार आहे.

दक्षिण रायगडमध्ये शासकीय सिटीस्कॅनची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना खाजगी सिटीस्कॅन करून घ्यावे लागत होते. त्याचे दर अव्वाचे सव्वा असून ते सामान्य व गरीब रुग्णांना परवडणारे नाहीत. उपजिल्हा रुग्णालयातील हे मशीन दुरुस्त झाल्यास शासनाच्या अत्यल्प दरात रुग्णांना सेवा मिळणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, दापोली, मंडणगड व महामार्गावरील अपघातग्रस्त व लहान मोठया आजारावरील रुग्णांवर तातडीचे उपचार व्हावेत व त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगाव येथे मध्यवर्ती ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय उभारले आहे. परंतु इथे नेहमीच तज्ञ डॉक्टरांची उपेक्षा कायम राहिली आहे. कधी डॉक्टर तर कधी तपासणी व उपचारासाठी लागणारी आवश्यक उपकरणें यामुळे रुग्णांना अलिबाग, मुंबई येथे पाठविले जाते. अपघातग्रस्त व अन्य रुग्णांवर इथेच उपचार व्हावेत व त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगावला सिटीस्कॅनची गरज होती.

उपजिल्हा रुग्णालयात बसविण्यात आलेली सिटीस्कॅन मशीन क्रष्णा डायगनॉस्टिक लि. पुणे. यांच्या मार्फत बसविण्यात आली असून हे काम पूर्ण झाले असून ते लवकरच सेवेला येत आहे. त्यामुळे रुग्ण व नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर लहान मोठा अपघात झाल्यास त्याच्यावर तातडीने उपचार करून त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगाव येथे शासनांनी शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारले आहे. येथे सध्या लहान-मोठया शस्त्रक्रिया केल्या जातात परंतु अनेक वेळा मुंबई-पुणे शहरातून तज्ञ डॉक्टर या ग्रामीण भागात काम करण्यास इच्छुक राहात नाहीत. कधी या रुग्णालयात विविध तज्ञ डॉक्टरांची कमतरता तर कधी विविध टेक्निशियन व संबंधित उपचार करण्याच्या तपासणी मशीनमुळे रुग्णांना अलिबाग, मुंबई येथे पुढील उपचारार्थ धाव घ्यावी लागत होती.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

**निवडक**

## डेविडचा कडक षटकार

**नवी दिल्ली :** दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स संघात शनिवारी खेळवला गेला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यादरम्यान एक प्रेक्षक जखमी झाला. खलील अहमदने गोलंदाजी केलेल्या १४ व्या षटकात पाचव्या चेंडूवर टिम डेविडने ठोकला. मात्र, त्याच्या या षटकाराचा चेंडू थेट स्टँडमध्ये गेला. यावेळी तो चेंडू पकडण्याच्या प्रयत्नात असलेल्या प्रेक्षकाच्या चेहऱ्यावर तो चेंडू जाऊन आदळला.त्यामुळे वेगात आलेल्या या चेंडूमुळे तो प्रेक्षक जखमी झाला.

## लवकरच संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** बीसीसीआय निवडसमिती प्रमुख अजित आगरकर दिल्लीत दाखल झाले आहेत. भारताचा टी २० विश्वचषकासाठीचा १५ जणांचा संघ निश्चित केला जाणार आहे. शनिवारी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामन्यात फक्त रोहित शर्माच नाही तर संघातील संभाव्य खेळाडू ऋषभ पंत, अक्षर पटेल, इशान किशन, हार्दिक पांड्या, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव हे देखील सामन्यात खेळताना दिसले. अन्य खेळाडूदेखील आयपीएल खेळत आहेत.

## राजस्थानला अजूनही भीती

**राजस्थान :** राजस्थान रॉयल्सने शनिवारी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध ७ गडी राखून विजय मिळवला. हा राजस्थानचा यंदाच्या हंगामातील ९ सामन्यांतील ८वा विजय ठरला आहे. त्यांनी आत्तापर्यंत केवळ एक पराभव पाहिला आहे. पॉइंट्स टेबलमध्ये राजस्थान अव्वल क्रमांकावर आहेत. राजस्थानसाठी या काम गिरीमुळे प्लेऑफचा मार्ग सोपा असला, तरी अद्याप ते प्लेऑफसाठी पात्र ठरलेले नाहीत. असे असतानाही अद्याप राजस्थान अधिकृतरित्या प्लेऑफसाठी पात्र का ठरले नाहीत, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

## ईशानवर दंडाची कारवाई

**दिल्ली :** शनिवारी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स संघात सामना झाला होता. या सामन्यानंतर मुंबईचा यष्टीरक्षक फलंदाज ईशान किशनवर नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी बीसीसीआयने कारवाई केली आहे. त्याच्यावर सामना शुल्काच्या १० टक्के दंडाची कारवाई झाली आहे.बीसीसीआयने या सामन्यानंतर दिलेल्या माहितीनुसार ईशान किशनने आयपीएलच्या आचारसंहितेच्या कलम २.२ अंतर्गत लेव्हल १ ची चूक कली आहे. त्याने त्याची चूक मान्य केली असून कारवाईही मान्य केली आहे.

## गॅरी कर्स्टन पाकचा कोच

**लाहोर :** ऑस्ट्रेलियाचा शेन वॉटसन आणि वेस्ट इंडिजचा डॅरेन सॅमी पाकिस्तान संघाचे मुख्य प्रशिक्षक बनण्याची चर्चा होती. आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कोच मिळाला आहे.पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २०११ मध्ये भारताला विश्वचषक मिळवून देणारा गुरू दक्षिण आफ्रिकेचा गॅरी कर्स्टनला वनडे आणि टी२० संघाचा प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्यासोबत ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज जेसन गिलेस्पीला कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्त करण्यात आले आहे.

# मुंबई गोलंदाजीत नापास

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



आयपीएल २०२४... लिलावापासून ते हंगाम सुरू होण्यापर्यंत सतत चर्चेत असलेला संघ म्हणजे मुंबई इंडियन्स! रोहितला कॅप्टन्सीवरून हटवणं, पांड्याला कर्णधार करणं, पांड्याविरूद्ध प्रचंड हुटिंग होणं या नॉन क्रिकेटिंग गोष्टींमुळंच ही फ्रेंचायजी चर्चेत आली. याचा परिणाम त्यांच्या सांघिक कामगिरीवर होणार नाही असं शक्यच नव्हतं. आतापर्यंत खेळलेल्या ९ सामन्यात तो परिणाम आपल्याला दिसतोय.

मात्र या सगळ्या निगेटिव्ह गोष्टींमध्ये देखील मुंबईनं आपलं वैशिष्ट्य जपलं आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई खडूसपणासाठी ओळखली जाते. आयपीएलमध्ये देखील ते कानामागून येत तिखट झाल्याचं अनेकवेळा आपण पाहिलं आहे. यंदाच्या हंगामात देखील त्यांनी समोर कोणतंही आव्हान आलं तरी ते चेस करण्याचा जोरदार प्रयत्न केला. मग ते २८७ धावांचं आव्हान असो किंवा दिल्ली कॅपिटल्सविरूद्धचे २५८ धावांचे आव्हान असो.

मुंबईच्या फलंदाज आपल्या संघाला २५० च्या जवळ घेऊन जाताना दिसतायत. मात्र त्यांचा हा प्रयत्न त्यांना विजयापर्यंत मात्र घेऊन जाऊ शकत नाही. कारण मुंबईची गोलंदाजी अत्यंत सुमार दर्जाची होत आहे. इम्पॅक्ट प्लेअरमुळं आधीच गोलंदाजांचे बुरे दिन सुरू झालेत. त्यात बुमराह सोडला तर मुंबईकडं असा हुकमी एक्का कोण नाही.

बुमराहच्या चार षटकांचा अपवाद सोडला तर मुंबईचा प्रत्येक गोलंदाज जवळपास १० च्या इकॉनॉमीने धावा देतोय. दिल्ली कॅपिटल्सविरूद्धच्या सामन्यात देखील हेच झालं. दिल्लीविरूद्धच्या सामन्यात ल्युक वूडनं ४ षटकात ६८, तुषारानं ४ षटकात ५६ धावा दिल्या. कर्णधार पांड्यानं तर कहर केला. त्यानं २ षटकात २० च्या इकॉनॉमीनं तब्बल ४० धावा दिल्या.

दिल्लीकडून सलामीवीर जॅक फ्रेजर मॅक्गर्कनं तर पॉवर प्लेचा पुरेपूर वापर कसा करायचा हाचा एक आदर्शच घालून दिला आहे. तो धावांकडं नाही तर स्ट्राईक रेटकडंच जास्त लक्ष देतोय असं वाटतं. जॅक फ्रेजर आणि अभिषेक पोरेल यांनी आठ षटकात ११४ धावांची सलामी दिल्यानंतरच दिल्ली २५० धावांच्या पार जाणार हे स्पष्ट झालं होतं.

तसं दिल्लीनं करूनही दाखवलं. शाय होपच्या १७ चेंडूत ४१ धावा, ट्रिस्टन स्टब्सच्या २५ चेंडूत ४८ धावा टी २० क्रिकेटचं बदलतं स्वरूप सांगून जातात. दिल्लीच्या पाच फलंदाजांनी १५० पेक्षा जास्तच्या स्ट्राईक रेटनं धावा ठोकल्या. तिलक वर्मानं ३२ चेंडूत ६३ धावा ठोकल्या. हार्दिकनंही गोलंदाजीत दिलेल्या धावा फलंदाजीत वसूल करत नुकसान भरपाई करण्याचा प्रयत्न केला.त्यानं २४ चेंडूत ४६ धावा ठोकल्या. मात्र त्याच्याकूडन सामना फिनिश करण्याची अपेक्षा होती. तो भारताचा मॅच फिनिशर आहे. परंतु पांड्याला काही मोठा धमाका करता आला नाही. टीम डेव्हिडनेही १७ चेंडूत ३७ धावा चोपल्या. त्यांनी मुंबई आता २५७ धावांचं आव्हान पार करणार असं चित्र निर्माण केलं होतं.

मात्र दिल्ली अन् मुंबईच्या संघातील फरक हा शेवटच्या षटकात दिसला. मुंबईला विजयासाठी २५ धावांची गरज होती. क्रिजवर अजून तिलक वर्मा होता. मात्र मुकेश कुमारनं पहिल्या चेंडूवर वर्माला हात खोलण्याची संधी दिली नाही.

# ज्योती वेन्नमची सुवर्ण हॅट्ट्रिक

## कंपाउंड प्रकारात महिला-पुरुष विजेते

**। शांघाय । वृत्तसंस्था ।**

भारताची तिरंदाज ज्योती सुरेखा वेन्नम हिने कमाल केली. एकाच स्पर्धेत तीन सुवर्णपदके मिळवण्याचे ऐतिहासिक यश मिळवले. त्यामुळे भारतीय महिलांनी तिरंदाजी विश्वकरंडक स्पर्धेत कंपाउंड प्रकारात विजेतेपद मिळवले. ज्योतीने वैयक्तिक कंपाउंड प्रकारात मेक्सिकोच्या अँड्रिया बेसेरा हिचा पराभव करून या विश्वकरंडक स्पर्धेत आपले तिसरे सुवर्ण जिंकले. त्याअगोदर तिने कंपाउंड मिश्र आणि महिला कंपाउंड प्रकारातही सुवर्णपदक मिळवले होते.

एकाच विश्वकरंडक स्पर्धेत तीन सुवर्णपदके जिंकणारी ती दुसरी भारतीय महिला ठरली. अशी कामगिरी दीपिका कुमारीने २०२१ मध्ये केली होती. सारा लोपेझ (२०१६) आणि साराह सोनिचसेन (२०१७) या परदेशी महिलांनीही अशीच कामगिरी केलेली आहे. या यशासह ज्योती ताक्सेला येथे होणाऱ्या विश्वकरंडक तिरंदाजी अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहे.



महिलांच्या सांघिक अंतिम फेरीत ज्योती, आदिती स्वामी आणि परनीत कौर यांनी इटलीचा २३६-२२५ असा पराभव करताना केवळ चारच गुण गमावले; तर पुरुषांच्या सुवर्णपदकाच्या लढतीत अभिषेक वर्मा, प्रियांश आणि प्रथमेश यांनी नेदरलँडच्या संघावर मात करताना अवघे दोन गुण गमावले. त्यांनी ही लढत २३८-२३१ अशी जिंकली. मिश्र प्रकारात ज्योती आणि वर्मा यांनी प्रतिस्पर्धी लिसेल जातमा आणि रॉबिन जातमा यांचे कडवे आव्हान १५८-१५७ असे मोडून काढले.

महिलांच्या सांघिक अंतिम फेरीत ज्योती, आदिती आणि परनीत यांच्याकडून परफेक्ट १० ची अचूकता केवळ दोनदा हुकली; परंतु त्यांनी १७८-१७१ अशी मोठी आघाडी घेत मार्सेला तोनिओली, इरेन्स फ्रँचिनी आणि इलिसा रोनर यांना मागे टाकले. भारतीय पुरुष संघ चौथे मानांकित होता, पण नेदरलँडसच्या प्रतिस्पर्ध्यांवर त्यांनी आपली हुकूमत सिद्ध केली. त्यांनी पहिल्याच फेरीत ६० गुणांची कमाई करताना केवळ दोन गुण गमवले होते. त्यानंतरही त्यांनी ६० गुणांची वसुली केली. दुपारच्या सत्रात झालेल्या वैयक्तिक प्रकारात ज्योती सुरुवातीला काहीशी मागे पडली होती.

# भारतीय महिला बॅडमिंटन संघाची विजयी सुरुवात

**। चेंगडू (चीन) । वृत्तसंस्था ।**

शनिवारी (२७ एप्रिल) चेंग्दू, चीन येथे सुरु झालेल्या उबेर करंडक बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या नवोदित महिला संघाने शानदार सुरुवात केली. भारतीय महिला संघाने कॅनडाचा ४-१ असा पराभव करुन दणक्यात सुरुवात केली.

आसामच्या अस्मिता छलिहा आणि इशारानी बारुआ, मणिपूरच्या प्रीया कोंजेनबाम यांनी अनुभवी खेळाडू संघात नसतानाही धैर्य दाखवले, तर १७ वर्षीय अनमोल खारब आणि श्रृती मिश्रा यांनी आपली गुणवत्ता सादर केली. भारतीय संघात २४ वर्षीय अस्मिता हीच एकेरीतील अनुभवी खेळाडू आहे. तिचा सामना कॅनडाची विख्यात खेळाडू मिचेली ली हिच्याविरुद्ध झाला.या सामन्यात जागतिक क्रमवारीत ५३ व्या क्रमांकावर असलेल्या अस्मिताने २५ व्या क्रमांकावर असलेल्या मिचेल लीला २६-२४, २४-२२ अशी मात केली.

पहिल्या गेममध्ये अस्मिता १-६ असे पिछाडीवर पडली होती, परंतु ५-७ अशी पिछाडी भरून काढल्यानंतर ९-८ आणि ११-१० अशी आघाडी घेऊन उमेद कायम ठेवली आणि तेथून पुढे आत्मविश्वास उंचावत तिने मिचेलीचा प्रतिकार मोडून काढला.महिलांच्या दुहेरीत प्रीया आणि श्रृती मिश्रा आणि कॅनडाच्या जोडीवर २१-११, २१-१० अशी सहज मात करुन भारताला २-० आघाडी मिळवून दिली. प्रीया आणि श्रृती या राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या आहेत. दुहेरीतील या शानदार यशानंतर तिसऱ्या एकेरीत २० वर्षीय इशारानी हिनेही आपला ठसा उमटवला आणि वेन यू झँग हिचा २१-१३, २१-१३ असा पराभव करुन ३-० अशी आघाडी मिळवून दिली.

महिलांच्या दुसऱ्या दुहेरीत मात्र भारताच्या सिमरन आणि रितिका यांना जॅकी डेंट व क्रिस्टल लाई यांच्याकडून १९-२१, १५-२१ अशी हार स्वीकारावी लागली. अखेरच्या एकेरीत अनमोलने जागतिक क्रमवारीत ८५ व्या स्थानावर असलेल्या एलिना झँगचे आव्हान २१-१५, २१-११ असे मोडून काढले आणि भारताच्या ४-१ अशा वर्चस्वावर मोहोर उमटवली.

# रायपाटण येथे ८ मे रोजी कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**राजापूर :** तालुक्यातील रायपाटण गांगणवाडी येथील जागृत सेवा मंडळातर्फे अक्षय तृतीयेनिमित्त मंडळाचे आद्य संस्थापक अनंतदादा गांगण स्मृती चषक भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. ८ आणि ९ मे रोजी दोन दिवस ही स्पर्धा रायपाटण येथील श्रीवडची आई मंदिर येथे होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघाला १५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे बक्षीस दिले जाणार आहे. (कै.) अरूणा अनंत गांगण यांच्या स्मरणार्थ जगदीश अनंत गांगण आणि कुटुंबिय यांच्यावतीने पुरस्कृत केले आहे. उपविजेत्या संघाला १० हजार रुपयांसह स्मृतिचिन्ह दिले जाणार असून, ते अमोल अशोक गांगण यांनी तर तृतीय क्रमांक विजेत्याला ३ हजार ५०० रुपयांसह स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे. हे (कै.) देवदास रघुनाथ गांगण यांच्या स्मरणार्थ प्रवीण देवदास गांगण आणि कुटुंबीयांनी पुरस्कृत केले आहे. चौथ्या क्रमांकाला ३ हजार ५०० रुपये (कै.) रमेश रघुनाथ गांगण यांच्या स्मरणार्थ शैलेश श्रीधर गांगण आणि कुटुंबियांनी पुरस्कृत केले आहे. याशिवाय स्पर्धेमध्ये लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पकड, सर्वोत्तम खेळाडू यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे.

# अखिल भारतीय मानांकन चॅम्पियनशिप सिरीज टेनिस स्पर्धा

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

डेक्कन एज्युकेशन सोसायटी व शेपींग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डीईएस एम एसएलटीए पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन(१६ वर्षाखालील) चॅम्पियनशिप सिरीज टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात प्रज्ञेश शेळके, रोहन बजाज, सक्षम भन्साळी, दक्ष पाटील, नीव कोठारी यांनी तर, मुलींच्या गटात काव्या देशमुख, देवांशी प्रभुदेसाई, स्वरा जावळे यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमी येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित आराध्य म्हसदेने आदित्य योगीचा ६-२, ६-३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. काल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या प्रज्ञेश शेळकेने नीव गोगियाचा ६-३, ६-४ असा पराभव केला. आठव्या मानांकित जय गायकवाडने आदित्य गायकवाडचा टायब्रेकमध्ये ६-०, ७-६(२) असा पराभव केला. सातव्या मानांकित दक्ष पाटीलने क्वालिफायर आर्यन किर्तनेचा ७-५, ६-१ असा तर, दुसऱ्या मानांकित सक्षम भन्साळीने शारव शर्माचा ६-०, ६-२ असा सहज पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित स्वानिका रॉयने वैष्णवी नागोजीचे आव्हान ६-०, ६-२ असे संपुष्टात आणले. शर्मिष्ठा कोद्रेने रितू ग्यानचा टायब्रेकमध्ये ७-५, ७-६(५) असा पराभव केला. चौथ्या मानांकित मेहक कपूरने आरोही देशमुखला ६-२, ६-२ असे नमविले. दुसऱ्या मानांकित काव्या देशमुखने अहाना पाटीलचा ६-३, ६-० असा पराभव करून आगेकूच केली.

तिसऱ्या मानांकित देवांशी प्रभुदेसाईने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या रित्सा कोंडकरचा ६-०, ६-१ असा पराभव केला. वैष्णवी चौहानने परी हिंगलेचा ६-४, ६-४ असा संघर्षपूर्ण पराभव केला.

# मूल्यशिक्षण संवर्धन स्पर्धेत मोहित प्रथम

**पावस :** इस्कॉन या संस्थेकडून भगवद्गगीतेवर आधारित मूल्यशिक्षण संवर्धन ही राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत रत्नागिरीतील जीजीपीएस शाळेचा मोहित कुरतडकर विद्यार्थी जिल्ह्यात अव्वल आला आहे. त्याची राष्ट्रीय स्तरावर पन्नास विद्यार्थ्यांमध्ये निवड झाली आहे. पहिल्या स्तरावर लिखित स्वरूपात, दुसऱ्या स्तरावर मोबाईल इंटरव्यू आणि तिसऱ्या स्तरावर झूम इंटरव्यू हे तिन्ही स्तर पार करत मोहितने अव्वल कामगिरी केली. सातवीमध्ये शिकणाऱ्या मोहितने जिल्हास्तरावर निवडलेल्या सहा विद्यार्थ्यांमध्ये ९९ टक्के गुण प्राप्त केले आहेत. इस्कॉनने सायकल देऊन मोहितचा गौरव केला. २३ एप्रिलला राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या ५० विद्यार्थ्यांचा भारतीय अंतराळ संशोधन अर्थात इस्त्रोने सन्मान केला.

# जेएसडब्ल्यू व लीप जिम्नॅस्टिक दहा हजार जिम्नॅस्टिक घडवणार



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

जेएसडब्ल्यू ग्रुपच्या लीप जिम्नॅस्टिक अकादमीने देशात येत्या पाच वर्षांत दहा हजार उत्तम जिम्नॅस्टिक खेळाडू घडवण्याचे लक्ष ठेवले असून मुंबईतही एक हजार खेळाडूंना प्रशिक्षण दिले जाईल. लीप जिम्नॅस्टिक्स हा जेएसडब्ल्यू ग्रुपचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून आतापर्यंत जेएसडब्ल्यू समूहाने इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स स्काऊटतर्फे भारतात फुटबॉल, बॉक्सिंग, कुस्ती, पोहणे, जुडो, ट्रॅक अँड फीड या खेळात विशेष प्रशिक्षण मोहीम राबवली आहे.

या संयुक्त मोहिमेनुसार आज वरळी येथे एका प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. सध्या मुंबईत त्यांच्या तीन केंद्रांत एक हजार मुलांना प्रशिक्षण दिले जाते. लवकरच मुंबईत आणखीन तीन केंद्रे उघडली जातील; तर देशभरात पुढील वर्षभरात दहा हजार खेळाडूंना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या उपक्रमात जागतिक दर्जाचे खेळाडू तयार केले जातीलच, पण त्यांचा प्रशिक्षण अभ्यासक्रमही तयार केला जाईल. तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्य घेऊन खेळाडूंसह प्रशिक्षक आणि पंचदेखील तयार केले जातील. त्यासाठी त्यांचे प्रशिक्षण आणि मान्यता यांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. यासाठी लीप जिम्नॅस्टने आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक तज्ज्ञ किम डोडेल यांचे सहाय्य घेतले आहे.

महाराष्ट्र ॲमेच्युअर जिम्नॅस्टिक असोसिएशन बरोबर सहकार्य करून लीप जिम्नॅस्टिकतर्फे अकरा व बारा मे दरम्यान पहिली जिम्नॅस्टिक स्पर्धाही भरवण्यात येईल. त्यात राज्यातील अडीचशे जिम्नॅस्टिक सहभागी होतील.

# कुस्तीपटू विजय चौधरीला पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



कुस्तीचा आखाडा गाजवणारा आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू विजय नथ्थू चौधरी आता पोलिसांचे क्षेत्रही गाजवतोय. अप्पर पोलीस अधीक्षक पुण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अप्पर पोलीस अधीक्षक असलेल्या विजयला कुस्तीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल ‘ पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह ’ जाहीर करण्यात आले आहे.

पोलीस विभागात विविध पदांवर कार्यरत असून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान पोलिसांना राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर केला आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत हॅट्ट्रिक नोंदविणाऱ्या विजय चौधरीने महाराष्ट्र पोलीस दलात दोन वेळा सुवर्ण पदक जिंकले. तसेच २०२३ साली कॅनडा येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उंचावले होते.भविष्यातील मोठ्या कुस्ती स्पर्धा, तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव उंचाविण्यासाठी अथक परिश्रम घेणार असल्याचे विजय चौधरीने सांगितले. सध्या विजय चौधरी आपले गुरू हिंदकेसरी रोहित पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदकेसरी आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेची तयारी करत आहे.

# पाकिस्तानने साधली बरोबरी

**लाहोर :** न्यूझीलंड संघाने नुकताच पाकिस्तान दौरा केला. या दौऱ्यात दोन्ही संघात ५ सामन्यांची टी२० मालिका खेळवण्यात आली. या मालिकेतील पाचवा आणि अखेरचा सामना शनिवारी पाकिस्तानने ९ धावांनी जिंकला.पाकिस्तानच्या या विजयामुळे ५ सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता, तर दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताने विजय मिळवलेला. परंतु, तिसरा आणि चौथा सामना न्यूझीलंडने जिंकत मालिकेत आघाडी मिळवली होती.

न्यूझीलंडला पाचवा सामना जिंकून मालिकेत विजय मिळवण्याची संधी होती. मात्र, पाकिस्तानने पाचवा सामना जिंकत मालिका बरोबरीत सोडवली आणि मायदेशात मालिका पराभवाची मानहानी टाळली. या विजयासह पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमच्या नावावर एक विश्वविक्रमही झाला आहे.बाबरच्या नेतृत्वात पाकिस्तानने ४४ वा टी-२० विजय मिळवला आहे. त्याचमुळे बाबरने आता आंतरराष्ट्रीय टी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विजय मिळवणाऱ्या कर्णधारांच्या यादीत पहिला क्रमांक पटकावला आहे.

# देशातील महिला फुटबॉल नोंदणीत तब्बल १३८ टक्क्यांनी वाढ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

**देशात महिला फुटबॉलमध्ये मोठी प्रगती होत आहे. महिला खेळाडूंच्या नोंदणीत गेल्या दोन वर्षांत तब्बल १३८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. तरुण महिला खेळाडूंचा फुटबॉलकडे अधिक ओढा असल्याचे स्पष्ट होत आहे.**



अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनच्या खेळाडू नोंदणी आकडेवारीनुसार मार्च २०२४ पर्यंत २७,९३६ महिला खेळाडूंनी नोंदणी केली. जून २०२२ मध्ये ही संख्या ११,७२४ इतकी होती. आपल्या देशातील ही आकडेवारी महिलांमध्ये फुटबॉल किती लोकप्रिय आहे हे दर्शवत आहे, असे अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष कल्याण चौबे यांनी सांगितले.

संघटना म्हणून महिला फुटबॉलसाठी आम्ही करत असलेले प्रयत्न योग्य ट्रॅकवर आहे. आमच्या ‘इकोसिस्टी’मध्ये सध्या १६,२१२ महिला खेळाडू आहेत, अशी माहिती चौबे यांनी दिली. २०२३-२४ या मोसमासाठीही भारतीय महिला लीग तयार केली आहे. या व्यतिरिक्त द्वितीय श्रेणीही आम्ही निर्माण केली आहे. याचा निश्चितच फायदा महिला फुटबॉलपटूंना होणार आहे, असेही चौबे यांनी सांगितले.

चौबे पुढे म्हणाले, या महिला लीगचे थेट प्रक्षेपण होते, ते पाहून अनेक नवोदित मुलींचा ओढा फुटबॉलकडे वाढला आहे. २०२२-२३ च्या महिला लीगमध्ये १६ संघ होते; परंतु ही लीग अहमदाबाद या एकाच ठिकाणी झाली होती; परंतु यंदा हे १६ संघ होम आणि अवे धर्तीवर खेळणार आहेत. त्यामुळे प्रत्येक संघ आपल्या घरच्या मैदानावर खेळताना स्थानिक महिला खेळाडूंना प्रोत्साहित करू शकतात.

गतवेळच्या स्पर्धेत गोकुलम केरळा एफसी संघाने विजेतेपद मिळवले. ओडिशा एफसी संघाचे वर्चस्व त्यांनी मोडून काढले होते. द्वितीय श्रेणीच्या लीगमध्ये १५ क्लबचे संघ असतील. यातील सहा संघ अंतिम टप्प्यासाठी पात्र ठरतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)